मुंबई, रायगड, पुणे, संभाजी नगर, जालना, नांदेड, अमरावती, नागपूर, यवतमाळ, बीड, लातूर,नाशिक, जळगाव,चंद्रपूर, येथून एकाच वेळी प्रसिद्ध होणारे एकमेव दैनिक

www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

दैनिक **युवक आधार** मराठी

■ मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले ■ संपादक - संतोष शिवदास आमले




● उपसंपादक - श्री विलास गायकवाड ● कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे ● निवासी संपादक - श्री राकेश पाटील ● सह संपादक - श्री मुकुंद कांबळे ● महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे ● कायदेशीर सल्लागार - ॲड. सौ प्रियंका विजय मुंढे

■ वर्ष : 3 ■ अंक : ९९ ■ बुधवार, १७ डिसेंबर २०२५ ■ किंमत : ४ रु ■ पृष्ठ : ८ RNI MAHMAR/2023/89514

## थोडक्यात

### प्रशासनाने लोकाभिमुख व पारदर्शकपणे कार्य करावे – मुख्य सचिव राजेश अग्रवाल

**दैनिक युवक आधार**


**छ. संभाजीनगर :** शासनाच्या विविध कल्याणकारी योजना राबविताना त्या योजनांचा लाभ पात्र लाभार्थ्यांपर्यंत प्रभावीपणे पोहोचवण्यासाठी प्रशासनाने लोकाभिमुख राहून पारदर्शकपणे कार्य करावे, असे निर्देश मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांनी दिले.विभागीय आयुक्त कार्यालयाच्या सभागृहात छत्रपती संभाजीनगर विभागाची आढावा बैठक मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती. यावेळी विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर, विभागातील आठही जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी, जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी तसेच विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. या बैठकीत मुख्य सचिवांनी प्रत्येक जिल्ह्यात राबविण्यात येत असलेल्या विविध शासकीय योजनांची सविस्तर माहिती घेतली. योजनांच्या अंमलबजावणी दरम्यान येणाऱ्या अडचणी तत्काळ दूर करून कामांना गती देण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. नागरिकांना योजनांची माहिती सहज, सुलभ व स्थानिक भाषेत दिली जावी, तसेच त्यांच्या समस्या समजून घेऊन तातडीने निराकरण करण्यात यावे, असेही त्यांनी स्पष्ट केले. योजना प्रभावीपणे राबविताना विविध विभागांतील अधिकाऱ्यांनी परस्पर समन्वय साधून काम करणे अत्यंत आवश्यक असल्याचे सांगत, प्रशासनाबाबत सर्वसामान्य नागरिकांमध्ये सकारात्मकता निर्माण होणे गरजेचे असल्याचे मुख्य सचिव म्हणाले.

# माणिकराव कोकाटे यांचे मंत्रिपद धोक्यात

**दैनिक युवक आधार**

**नाशिक, प्रतिनिधी :**

बनावट कागदपत्रांच्या आधारे शासकीय सदनिका लाटल्याच्या प्रकरणात राज्याचे क्रीडामंत्री ॲड. माणिकराव कोकाटे यांना झालेली दोन वर्षांची शिक्षा सत्र न्यायालयाने कायम ठेवल्याने त्यांची आमदारकी व पर्यायाने मंत्रिपद धोक्यात आले आहे. मंत्री कोकाटे यांना जामीन मिळू नये म्हणून हस्तक्षेप याचिका करणाऱ्यांनी उच्च न्यायालयात कागदपत्रे सादर केल्याचे म्हटले आहे.वेगवेगळ्या कारणांमुळे वादात सापडणारे राष्ट्रवादी अजित पवार गटाचे मंत्री ॲड. कोकाटे हे सदनिका प्रकरणात शिक्षा कायम



राहिल्याने अडचणीत आले आहे.

बनावट दस्तावेजाच्या आधारे अल्प उत्पन्न गटातून शासकीय कोट्यातील सदनिका लाटून शासनाची फसवणूक केल्याप्रकरणी कनिष्ठ न्यायालयाने मंत्री माणिकराव कोकाटे आणि त्यांचे बंधू विजय कोकाटे यांना दोन वर्षांचा कारावास आणि प्रत्येकी ५० हजार रुपये दंड, अशी शिक्षा ठोठावली होती. अपिलात सत्र न्यायालयाने कोकाटे बंधूंना जामीन मंजूर करून शिक्षेच्या अंमलबजावणीस आधीच स्थगिती दिली. अपिल प्रलंबित असेपर्यंत शिक्षेला स्थगिती न दिल्यास कोकाटे बंधुंचे नुकसान होईल, या बाबी न्यायालयासमोर मांडण्यात कोकाटे यांच्या वकिलांकडून मांडल्या गेल्या होत्या.या संदर्भात मूळ तक्रार दिवंगत माजीमंत्री तुकाराम दिघोळे यांनी केली होती. मंत्री कोकाटे यांच्या शिक्षेला सत्र न्यायालयाने तात्पुरती स्थगिती दिली होती. तेव्हा माजीमंत्री दिघोळे यांची कन्या ॲड. अंजली दिघोळे-राठोड यांनी हस्तक्षेप याचिका दाखल केली. त्यांची बाजू ॲड. आशुतोष राठोड यांनी मांडली. कनिष्ठ न्यायालयाची शिक्षा सत्र न्यायालयाने कायम ठेवल्याची माहिती ॲड. राठोड यानी दिली. सत्र न्यायालयाने अभिलेखाचे अवलोकन स्पष्ट निरीक्षण नोंदविले की, ज्या सदनिका कोकाटे यांनी घेतल्या. त्या निकषानुसार नाहीत. यात शासनाची फसवणूक झाल्याचे त्यांनी सांगितले. मुळात शिक्षा झाल्यानंतर मंत्री माणिक कोकाटे यांनी नैतिकतेच्या आधारावर राजीनामा देणे अपेक्षित होते. आता त्यांना जामीन मिळू नये म्हणून उच्च न्यायालयात कागदपत्रे सादर करून प्रक्रिया सुरू करण्यात आल्याचे ॲड. राठोड यांनी सांगितले.

## महिला डॉक्टरचा हिजाब ओढला

# नितीश कुमारांवर टीकेची झोड; तुमची तब्येत ठीक नसेल तर…

**दैनिक युवक आधार**

**नवी दिल्ली, प्रतिनिधी :**

बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार यांच्या एका कृतीमुळे मोठा वाद निर्माण झाला आहे. याप्रकरणी समाजवादी पक्षाचे नेते अबू आझमी यांच्यासह अनेकांनी त्यांच्यावर तीव्र टीका केली आहे. पाटण्यात झालेल्या एका शासकीय कार्यक्रमातील व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर हा प्रकार चर्चेत आला आहे.

**महिलांचा अपमान करणारे वर्तन**

या घटनेवर प्रतिक्रिया देताना समाजवादी पक्षाचे अबू आझमी म्हणाले, “अनेक वेळा मुख्यमंत्रीपद भूषवलेले आणि ज्येष्ठ नेते असलेल्या व्यक्तीकडून अशा प्रकारचे वर्तन होणे अत्यंत दुर्दैवी आणि महिलांचा अपमान करणारे आहे.”

**मुस्लिम महिलांच्या सन्मानाला धक्का**

ते पुढे म्हणाले, “महिला बुरखा किंवा हिजाब



घालतात, ही त्यांची वैयक्तिक निवड आहे. जबरदस्तीने तो काढण्याचा प्रयत्न करणे म्हणजे मुस्लिम महिलांच्या सन्मानाला धक्का देण्यासारखे आहे. यामुळे असा संदेश जातो की मुस्लिमांच्या जीवनाला काहीच किंमत नाही.”

**जोपर्यंत मुख्यमंत्री माफी मागत नाहीत, तोपर्यंत...**

अबू आझमी यांनी मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी संबंधित महिला डॉक्टरची जाहीर माफी मागावी, अशी मागणी केली.

# दिशा महिला मंचच्या वतीने कामोठे येथे महिलांसाठी मोफत फॅब्रिक पेंटिंग कार्यशाळेचे यशस्वी आयोजन

**दैनिक युवक आधार**

**पनवेल प्रतिनिधी :** दिशा महिला मंचच्या वतीने कामोठे येथील आई माताजी मंदिर सेक्टर 36 या ठिकाणी महिलांसाठी मोफत फॅब्रिक पेंटिंग कार्यशाळेचे यशस्वी आयोजन करण्यात आले. परिसरातील 32 महिलांनी या कार्यशाळेत सक्रिय सहभाग नोंदवला.

या कार्यशाळेसाठी प्रसिद्ध प्रशिक्षिका भावना सरदेसाई यांनी महिलांना फॅब्रिक पेंटिंगचे प्राथमिक ते प्रगत तंत्र अत्यंत सोप्या आणि प्रभावी पद्धतीने शिकवले. रंगांची निवड, डिझाईनची मांडणी, ब्रशचा वापर, तसेच फॅब्रिकवर टिकाऊ पेंटिंग कसे करावे याबाबत सविस्तर व उपयुक्त मार्गदर्शन त्यांनी केले. महिलांनी प्रत्यक्ष कृतीतून कला शिकण्याचा आनंद घेतला.या कार्यक्रमास दिशा महिला मंचच्या संस्थापक निलम आंधळे यांच्यासह उपाध्यक्ष विद्या मोहिते आणि जयदादा डिगोळे यांची विशेष उपस्थिती लाभली. उपस्थित मान्यवरांनी महिलांना स्वावलंबन, आत्मविश्वास आणि कौशल्यविकासाचे महत्त्व सांगत अशा उपक्रमांमुळे महिलांच्या सृजनशीलतेला



योग्य दिशा मिळते, असे मत व्यक्त केले. कार्यशाळेच्या माध्यमातून महिलांना घरबसल्या रोजगाराच्या संधी उपलब्ध होऊ शकतात, तसेच त्यांच्या कलागुणांना व्यासपीठ मिळावे, या उद्देशाने दिशा महिला मंच सातत्याने विविध उपक्रम राबवत असल्याचे यावेळी सांगण्यात आले.कार्यशाळेच्या यशस्वी आयोजनाबद्दल सहभागी महिलांनी दिशा महिला मंचचे आणि प्रशिक्षिका भावना सरदेसाई यांचे मनःपूर्वक आभार मानले.

भविष्यातही अशा उपयुक्त व प्रेरणादायी कार्यशाळांचे आयोजन करण्यात यावे, अशी अपेक्षा महिलांनी व्यक्त केली.

# थेपडे विद्यालय, म्हसावदला तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनात तृतीय क्रमांक

**दैनिक युवक आधार**

**जळगाव/समाधान पाटील :** आज दिनांक 15 /12 /2025 रोजी सौ. हिराबाई जगतराव पाटील माध्यमिक विद्यालय, शिरसोली ता. जि जळगांव तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शन संपन्न झाले . यात थेपडे विद्यालयाचा इ ९वी चा विद्यार्थी अरहम अस्लम पठाण या विद्यार्थ्याने सादर केलेला AI ROBOT



या नावीन्यपूर्ण प्रकल्पाला तृतीय क्रमांक मिळाला त्याच्या या यशाबद्दल शाळेचे चेअरमन आदरणीय डॉ. केदारजी थेपडे साहेब यांनी त्याचे अभिनंदन केले. तसेच शाळेचे मुख्याध्यापक आदरणीय श्री .जी .डी. बच्छाव सर , उपमुख्याधापक आदरणीय श्री.एस के.भंगाळे सर व पर्यवेक्षक आदरणीय श्री. के.पी.पाटील सर ,शिक्षक प्रतिनीधी श्री. एस. डी. चव्हाण सर तसेच सर्व शिक्षक बंधू भगिनींनी यशस्वी विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक विज्ञान विषय शिक्षकांचे हार्दिक अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# खड्ड्यांमुळे होणाऱ्या अपघातांची शहानिशा करण्यासाठी समितीची स्थापना; मा. उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार समिती गठीत

**दैनिक युवक आधार**

**ठाणे, प्रतिनिधी :**

रस्त्यावरील खड्डे, उघडी गटारे, तसेच रस्त्यांच्या देखभालीतील त्रुटीमुळे झालेल्या मृत्यू किंवा जखमी झालेल्या अपघातग्रस्तांना भरपाई निश्चित करुन ती वितरीत करण्यासाठी विशेष समिती स्थापन करण्याचे निर्देश




मा. उच्च न्यायालयाने १३ ऑक्टोबर २०२५ रोजी दिले आहेत. या आदेशानुसार ठाणे महानगरपालिका क्षेत्रासाठी महापालिका आयुक्त, ठाणे महानगरपालिका ठाणे यांची अध्यक्ष व सचिव जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, ठाणे यांची सदस्य म्हणून समिती स्थापन करण्यात आली आहे. या समितीची बैठक आयुक्त सौरभ राव यांच्या अध्यक्षतेखाली आज पार पडली.

# दीड महिन्यात मुंबईतील रस्त्यांवरून साफ केली ६८ टन धूळ; बीएमसीची मुंबई उच्च न्यायालयात माहिती

**दैनिक युवक आधार**

**मुंबई , प्रतिनिधी :**

शहरातील वातावरणाची स्थिती दिवसेंदिवस बिघडत असून त्यावर नियंत्रण मिळवण्यासाठी मुंबई महानगरपालिकेकडून विविध स्तरांवर उपाययोजना केल्या जात आहेत. गेल्या दीड महिन्यात मुंबईच्या रस्त्यावरून बृहन्मुंबई महापालिकेनं (बीएमसी) टँकरच्या माध्यमातून पाणी फवारत तब्बल ६७.८६ टन धूळ झाडल्याची माहिती महापालिकेनं प्रतिज्ञापत्रावर हायकोर्टात सादर केलीय.

एक्यूआय सुधारण्यासाठी काम केल्याचा मुंबई महापालिकेचा दावा- मुंबईच्या हवेचा दर्जा प्रदूषणामुळे घसरला असून याप्रकरणी मुंबई उच्च न्यायालयानं दोन वर्षांपूर्वी सुमोटो याचिका दाखल करून घेतलीय. या याचिकेवर सोमवारी मुख्य न्यायमूर्ती चंद्रशेखर आणि न्यायमूर्ती गौतम अनंखड यांच्या खंडपीठासमोर सुनावणी घेण्यात आली. त्यावेळी पालिकेच्या पर्यावरण आणि



हवामान विभागाचे मुख्य अभियंता अविनाश काटे यांनी पालिकेच्यावतीनं प्रतिज्ञापत्र सादर करत पालिकेनं यासंदर्भात केलेल्या उपाययोजनांची माहिती दिली. त्यात त्यांनी म्हटलंय की, मुंबईत सध्या १,९५४ बांधकाम साईट्स सुरू आहेत. त्यापैकी १,०२० साईट्सवर लो कॉस्ट सेन्सर बसवण्यात आलेत. याशिवाय विविध ठिकाणी ७४६ सेन्सर बसवण्यात आलेत. यातून प्रदूषणाचा सारा डेटा एकत्र गोळा केला जातोय.

**महापालिकेकडून रस्ते सफाईचा दावा**

■ धुळीचं प्रदूषण वाढू नये म्हणून बीएमसीनं टँकरच्या साहाय्यानं गेल्या दीड महिन्यात मुंबईच्या २४ वॉर्ड मधील १५१८.३५ किलोमीटरचे रस्ते धुवून काढत तब्बल ६७.८६ टन धूळ साफ केली.

■ नोव्हेंबर महिन्यात १५७ टँकर वापरून ४०२ किलोमीटरचे रस्ते धुऊन १२.४१ टन धूळ साफ केलीय.

■ ८ डिसेंबरपर्यंत ३८७ टँकर वापरून १११६.३६ किमीचे रस्ते धुऊन ५५.४५ टन धूळ साफ केलीय.

■ सकाळी ६ ते सायंकाळी ६ पर्यंत दोन शिफ्टमध्ये १७९ वेळा मिस्ट मशिनची फवारणी करत ८०२.८ किमी रस्त्यांवरील प्रदूषण नियंत्रणात आणलंय.

■ नोव्हेंबर महिन्यात ४३ मिस्ट मशिनच्या सहाय्यानं २०१.९ किमीच्या रस्त्यांवर फवारणी केलीय.

■ ८ डिसेंबरपर्यंत १३६ मिस्ट मशिनच्या सहाय्यानं ६००.९ किमीच्या रस्त्यांवर फवारणी केलीय.

■ महापालिकेनं जून २०२५ पासून रस्त्यांवर बेकायदेशीरपणे क्रॉंक्रिट आणि इतर मलबा वाहून नेणाऱ्या ३१५ वाहनांवर कारवाई करत ८,०३,३०९ रूपयांचा दंड आकारलाय.

■ जून २०२५ पासून रस्त्यांवर बेकायदेशीरपणे बांधकामातील मलबा फेकणाऱ्यांवर 567 केस दाखल करत त्यांच्यावर ३२,३४,३९१ रूपयांचा दंड आकारलाय.

■ जून २०२५ पासून उघड्यावर घनकचरा फेकणाऱ्यांवर १०७ गुन्हे दाखल करत ८४,७०० रूपये दंड आकारलाय.

**मुंबईतील पारंपारिक बेकऱ्यांची धुरांडी अद्यापही सुरूच -** महापालिकेच्यावतीनं प्रतिज्ञापत्रात स्पष्ट करण्यात आलंय की, बीएमसीच्या हद्दीत एकूण ५९३ बेकऱ्या आहेत. यापैकी २०९ बेकऱ्या आधीच हरित इंधनावर कार्यरत होत्या.

# भारताचा जीडीपी ७ टक्के दराने वाढणार

## आर्थिक वर्ष २०२६ बाबत क्रिसिलच्या अंदाजात वाढ

**दैनिक युवक आधार**

**नवी दिल्ली, प्रतिनिधी :**

चालू आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये भारतीय अर्थव्यवस्था ७.० टक्के दराने वाढेल, असे क्रिसिलने म्हटले आहे. देशाने पहिल्या सहामाहीत मजबूत वाढ नोंदवल्यानंतर लगेचच क्रिसिलने आपला वाढीचा अंदाज ५० आधार अंकांनी वाढवला आहे. पहिल्या सहामाहीत अपेक्षेपेक्षा जास्त ८ टक्के जीडीपी वाढ नोंदवल्यानंतर क्रिसिलने या आर्थिक वर्षासाठीच्या जीडीपीच्या अंदाजात सुधारणा केली आहे.आम्हाला अपेक्षा आहे की, आर्थिक वर्ष २०२६ मध्ये जीडीपी ७ टक्के दराने वाढेल, तर आर्थिक वर्ष २०२५ मध्ये हा दर ६.५ टक्के होता. घसरणारी महागाई,




जीएसटीचे सुलभीकरण आणि आयकर सवलतीमुळे देशांतर्गत वापरामुळे वाढीला चालना मिळण्याची शक्यता आहे, असे क्रिसिल या एका जागतिक विश्लेषण कंपनीने आपल्या अहवालात म्हटले आहे.

तथापि, अमेरिकेचे निर्यातीवरील शुल्क-भारताच्या निर्यात आणि गुंतवणुकीसाठी धोका निर्माण करतात, जरी अमेरिका-भारत व्यापार करारावर लक्ष ठेवणे आवश्यक आहे, असा इशाराही क्रिसिलने दिला आहे.

आर्थिक वर्ष २०२६ च्या दुसऱ्या तिमाहीत जीडीपी वाढ वार्षिक आधारावर ८.२ टक्क्यांपर्यंत वाढली, जी मागील तिमाहीतील ७.८ टक्क्यांपेक्षा जास्त होती. मजबूत वापर आणि सप्टेंबर २०२५ च्या जीएसटी दर सुलभीकरणामुळे ही वाढ झाली.

# विद्युत तार घरावरून गेल्याने अपघाताची शक्यता !

## वीज वितरण कंपनीला संतोष भालेराव याचे निवेदन

**दैनिक युवक आधार**

**वाशिम/गजानन पवार पाटील :** रिसोड तालुक्यातील दापुरी खुर्द येथील रहिवासी यांनी वीज वितरण अभियंता यांच्याकडे तक्रार दाखल केली की, 11 के.व्ही विद्युत पुरवठ्याचे तार माझ्या घरावरून गेल्यामुळे जीवित हानी होण्याची दाट शक्यता आहे. त्यामुळे सदर तार घरावरून काढून इतर ठिकाणी हलविण्यात यावे अशी मागणी जिल्हा अधीक्षक अभियंता यांना दिलेल्या निवेदनातून केली आहे.



विद्युत महावितरण कंपनीचा 11 के .व्ही विद्युत लाईनचा तार पूर्वी शासनामार्फत मिळालेल्या घरकुलावरून आधीपासून गेला असून तार तुटून मानवांची जीवित हानी होण्याची दाट शक्यता असल्यामुळे विद्युत लाईनचा तार तातडीने शिफ्ट स्थलांतरित करण्यात यावी अशी मागणी करण्यात आली आहे. संतोष वामन भालेराव दापुरी खुर्द येथील रहिवासी असून माझ्या वडिलांना शासनामार्फत 25 वर्षांपूर्वी दापुरी खुर्द येथे घरकुल मिळाली, 11के.व्हीं विद्युत लाईनच्या ताराच्या खाली व ताराच्या आजूबाजूला एकूण 18 घरकुले आहेत. सुसाट वेगाने वारे आले. की वारंवार तारले तार घासून शॉर्ट सर्किट होत राहतो. आमचे घर तारा खाली असल्यामुळे 24 तास तारा खाली राहावे लागते. त्यामुळे भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. शासनामार्फत मिळालेल्या घरकुलावर टिनचे पत्रे असल्यामुळे घरकुलावर किंवा तारा खाली असलेल्या व्यक्तीच्या अंगावर तार तुटून पडला तर खूप मोठा अपघात होऊन जीवित हानी होऊ शकते. विद्युत लाईनचा तार घरकुल बांधण्याच्या आधीपासून असला तरी विद्युत लाईनच्या तारा मुळे मानवाची जीवित हानी होऊ नये म्हणून, योग्य त्या दिशेने तार शिफ्ट असतात स्थनांतरित करण्यात यावा. विद्युत लाईनच्या तारामुळे अनुष्टित प्रकार घडण्याची शक्यता आहे. कोणत्याही प्रकारचे नुकसान झाले तर याला संबंधित कार्यालय जबाबदार राहील ही बाब गांभीर्याने घेऊन अतिशय जलद गतीने कारवाई करण्यात यावी. 11 के.व्ही विद्युत लाईनचा तास स्थलांतरित करण्याची कोणी काही प्रकारची फी न घेता तातडीने कारवाई करून 11 के.व्ही विद्युत लाईनचा तार शिफ्ट करून योग्य दिशेने स्थलांतरित करण्याचे आदेश संबंधित कार्यालयास देण्यात यावे असे निवेदन देण्यात आले आहे.

# राष्ट्रीय विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय वसारी येथे सिकलसेल सप्ताह साजरा

**दैनिक युवक आधार**

**रणजीतसिंह ठाकुर रिसोड/तालुका प्रतिनिधी :** रिसोड आज दिनांक 15.12.2025 रोजी राष्ट्रीय विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय येथे सिकलसेल आजार निर्मूलन अभियान अंतर्गत जनजागृती व तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले हा आजार अनुवंशिक असून त्यामध्ये घाबरण्याचे कारण नाही - डॉ संतोष बोरसे ,तालुका आरोग्य अधिकारी मालेगाव - सिकलसेल आजार हा अनुवंशिक असून पुढील पिढीला वाचविण्यासाठी व सतर्क करण्याकरिता सिकलसेलची तपासणी करणे अत्यंत गरजेचे आहे तसेच विवाह करण्यापूर्वी सिकलसेल तपासणी करून घ्यायलाच पाहिजेत एखादी नवरी किंवा नवरदेव पीडित किंवा वाहक असेल तर त्यावर काही उपाययोजना भविष्यामध्ये करता येईल त्यांना उपचाराखाली आणता येईल तपासणी केल्यामुळे त्या कुटुंबाचा मानसिक त्रास कमी होईल व पुढच्या पिढीला त्याचा फायदाच होईल असे मत तालुका आरोग्य अधिकारी डॉ. संतोष बोरसे सर यांनी शिबिरादरम्यान आपले मत व्यक्त केले तालुक्यामध्ये मां.जिल्हा आरोग्य अधिकारी साहेब डॉ.श्री पांडुरंगजी ठोंबरे सर, डॉ. कावरखे सर जिल्हा शल्यचिकित्सक,अतिरीक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.श्री विजय दामोदर काळे सर,जिल्हा सिकलसेल समन्वयक श्री.इंगोले सर यांच्या मार्गदर्शक सूचनेनुसार सिकलसेल



आजार निर्मूलन अभियान अंतर्गत जनजागृती व तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. शिबिरामध्ये विद्यार्थ्यांना खालील माहिती देण्यात आली सिकलसेल आजाराची लक्षणे,प्रकार ,सिकलसेल आजारावर करण्यात येणारे उपचार तसेच आजाराबाबत घ्यावयाची काळजी ,आजाराची गंभीरता व औषधोपचार व तपासणी शिबिर घेण्यात आले त्यामध्ये तालुका सिकलसेल सहाय्यक,श्री.भारत पारवे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन व माहिती दिली हा आजार आनुवंशिक असून येणाऱ्या पिढीला या आजारा पासून संरक्षण व्हावे यासाठी १ ते ४० वयोगटातील सर्व लाभार्थ्यांनी आपली सिकलसेल तपासणी करून घ्यावी.

यावेळी आरोग्य वर्धिनी उपकेंद्र वसारी अंतर्गत श्री. डॉ. गजानन वामनराव मिटकरी, श्री. नितीन अष्टोनकर,श्री.गोपाल तायडे,आरोग्य सेवक, उपस्थित होते.तसेच राष्ट्रीय विद्यालय वसारी येथील विद्यार्थ्यांची सिकलसेल सोल्यूबिलिटी तपासणी करण्यात आली,श्री.संतोष बकाल सर मुख्याध्यापक तसेच शाळेचे शिक्षक वृंद यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

# मेडशी आरोग्य केंद्राला राष्ट्रीय गुणवत्ता प्रमाणपत्र!; परीक्षकांच्या मूल्यमापनात पटकावले 92.55 टक्के गुण

**दैनिक युवक आधार**

**वाशिम/गजानन पवार पाटील :** मालेगाव तालुक्यातील मेडिशी प्राथमिक आरोग्य केंद्राने केंद्र सरकारच्या आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाकडून दिला जाणारा राष्ट्रीय गुणवत्ता आश्वासन मानक (एन क्यू ए एम) प्रमाणपत्र मिळवून आरोग्य सेवेत उत्कृष्टतेचा मानाचा टप्पा गाठला आहे. बाह्य परीक्षकांच्या सखोल व क** मूल्यमापनात या केंद्राने तब्बल 92.55 टक्के गुण मिळवत जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. केंद्रीय पथकाने 24 व 25 नोव्हेंबर 2025 रोजी मेडिसि प्राथमिक आरोग्य केंद्राचे सखोल निरीक्षण केले. या मूल्यमापनात रुग्णालयाचे स्वच्छता व्यवस्था, औषधांची उपलब्धता, रुग्णांना मिळणारी वागणूक, प्रस्तुती कक्षातील सुविधा, प्रयोग शाळेतील तपासण्यांची अचूकता तसेच आपत्कालीन परिस्थिती हाताळण्याबाबत कर्मचाऱ्यांची कौशल्य या सर्व बाबींचा सविस्तर आढावा घेण्यात आला. प्रत्येक मी कशांवर मेडशी आरोग्य केंद्राने उत्कृष्ट कामगिरी केली.हे प्रमाणपत्र केवळ औपचारिक सन्मान नसून मेडशी व परिसरातील नागरिकांना दिल्या जाणाऱ्या दर्जेदार आरोग्य सेवांचे प्रत्यक्ष धोतक आहे. गुणवत्ता टिकवून ठेवण्यासाठी प्रशासनाने पुढील टप्प्यांची आखणी केली असून, मूल्यमापन अहवालात नमूद केलेल्या किरकोळ त्रुटी दूर करून शंभर टक्के गुण मिळवण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. रुग्णांना अधिक आपुलकीची व तांत्रिकदृष्ट्या असं सेवा मिळावी यासाठी कर्मचाऱ्यांचे नियमित प्रशिक्षण, स्थानिक स्तरावर गुणवत्ता नियंत्रण समितीची स्थापना करून दरमहा आरोग्य सेवांचा आढावा घेण्यात येणार आहे.

> "हा केवळ कागदोपत्री सन्मान नसून मेडशी परिसरातील सामान्य नागरिकांना मिळणाऱ्या उत्तम आरोग्य सेवांचा ठोस पुरावा आहे. आमच्या सर्व डॉक्टर व कर्मचाऱ्यांच्या सांघिक परिश्रमाचे हे फलित आहे.
> डॉ. पी. एस. ठोंबरे
> जिल्हा आरोग्य अधिकारी, जि.प.वाशिम.

# रंगमंच UK प्रस्तुत 'अहल्या' ठाण्यात सादर

## मराठी नाट्यसृष्टीची जागतिक पताका अभिमानाने फडकावली

**दैनिक युवक आधार**

**विकास वायाळ/मुंबई प्रतिनिधी :** रंगमंच UK प्रस्तुत 'अहल्या' हा दीर्घांक नुकताच ठाणे आर्ट गिल्डच्या वतीने काशिनाथ घाणेकर नाट्यगृह, ठाणे येथे यशस्वीरीत्या सादर करण्यात आला. लंडनमध्ये स्थायिक झालेले रेश्मा विकास व विकास देशपांडे हे 'रंगमंच UK' या उपक्रमामागील प्रेरणास्थान आहेत. मराठी नाटकावरील प्रेमातून त्यांनी यूकेमधील नाट्यवेड्या कलाकारांना एकत्र आणत २०१४ पासून लंडनमध्ये मराठी नाट्यचळवळीची मुहूर्तमेढ रोवली.

नोकरी, करिअर व कौटुंबिक जबाबदाऱ्या सांभाळत हे कलाकार शनिवार-रविवारी वेळ काढून तालमी करतात आणि यूके



तसेच भारतात प्रयोग सादर करण्याचे स्वप्न प्रत्यक्षात उतरवत आहेत. २०१८ साली *'पन्नादाई'*नंतर आता *'अहल्या'*सारख्या दर्जेदार नाट्यकृतीसह रंगमंच UK ने भारत दौऱ्यात मराठी नाट्यसृष्टीचा जागतिक ठसा उमटवला आहे.अहल्येच्या आख्यायिकेवर आधारित समकालीन मांडणी असलेला 'अहल्या' हा दीर्घांक ओघवत्या भाषेमुळे, आशयघन संहितेमुळे आणि कलाकारांच्या सहज अभिनयामुळे प्रेक्षकांच्या मनाला भिडला. पारंपरिक चौकटीच्या पलीकडे जाऊन स्त्री-पुरुष संबंध, व्यक्तिस्वातंत्र्य, संवादाचा अभाव व समाजनिर्मित नीतिमत्ता यासारख्या प्रश्नांना निर्भीडपणे हात घालण्यात आला आहे.लेखिका व प्रमुख भूमिकेत रेश्मा विकास यांनी सशक्त अभिनयातून अहल्येचे अनेक पदर प्रभावीपणे उलगडले. त्यांना समीर शिरवाडकर, अलंकार उरणकर आणि मिलिंद आगरकर यांनी दमदार साथ दिली. सर्व कलाकारांचा रंगमंचावरील सहज वावर आणि पडद्यामागील टीमचे अचूक संयोजन यामुळे प्रयोग परिणामकारक ठरला. प्रयोग संपल्यानंतरही 'अहल्या' रसिकांच्या मनात दीर्घकाळ घोळत राहते. नाटकाचा पडदा खाली येतो, मात्र प्रेक्षकांच्या मनातील दीर्घांक तेव्हाच सुरू होतो, अशी प्रतिक्रिया अनेक रसिकांनी व्यक्त केली.

# सामाजिक कार्यातील सर्वोच्च पुरस्कार कोकणरत्न म्हणून दीपक फणसळकर यांची निवड

**दैनिक युवक आधार**

**मुंबई(प्रमोद तरळ) :** समाज तुमच्या कार्याची दखल तेव्हाच घेते जेव्हा तुमच्या सामाजिक कार्याचे दाखले नव्या तरुण पिढीसाठी दिले जातात.सामाजिक कार्यात कायम आपले योगदान देऊन समाजाला नव्या दिशेने घेऊन जाणारे छोट्या छोट्या कार्यांनी मोठे बदल घडून येतात तुमचं या कार्यात सातत्य टिकणे फार महत्वाचे असते .श्री फणसळकर यांची समाजाप्रती असलेली कार्यतत्पर सेवा आणि सातत्य आणि म्हणूनच स्वतंत्र कोकणराज्य अभियानातर्फे त्यांची "कोकणरत्न" या सर्वोच्च



पदवीसाठी निवड करण्यात आली .हा पुरस्कार त्यांना मुंबई मराठी पत्रकार भवन, आझाद मैदाना जवळ, मुंबई येथे स्वतंत्र कोकणराज्य अभियानाचे संस्थापक अध्यक्ष श्री संजय कोकरे आणि वरिष्ठ पत्रकार आणि संपादक श्री सचिन कळझुनकर सर यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला आणि पुढील सामाजिक कार्यासाठी शुभेछया देण्यात आल्या.

समाजात बरेच लोक सामाजिक कार्यात योगदान देत असतात हा पुरस्कार त्या सर्व समाज बांधवांचा आहे जे आपले घर संसार सांभाळून समाज कार्य करतात असा मोलाचा संदेश कार्यक्रम दरम्यान श्री दीपक फणसळकर यांनी दिला

# लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृतमहोत्सवानिमित्त सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर शाळेचा वृद्धाश्रम व आदिवासी आश्रम शाळेला भेटीचा उपक्रम

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी) :** माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या ७५ वर्ष पूर्तीनिमित्त अर्थात अमृत महोत्सवानिमित्त संपूर्ण वर्षभर समाजहिताचे विविध उपक्रम राबवण्याचा मोठा संकल्प करण्यात आला आहे. या संकल्पाला अनुसरून रयत शिक्षण संस्थेच्या उलवे नोड येथील सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर सीबीएसई स्कूल येथील विद्यार्थ्यांनी समाजसेवेची सुंदर परंपरा जोपासत माऊली वेलफेअर वृद्धाश्रम नेरुळ व आदिवासी आश्रम शाळा चिरनेर येथे भेट देऊन एक आदर्श सामाजिक उपक्रम पार पाडला.विद्यार्थ्यांनी ज्येष्ठ नागरिकांसाठी व गरीब व गरजू विद्यार्थ्यांना धान्य, किराणा साहित्य, भाजीपाला, घरगुती आवश्यक वस्तू, स्वच्छता साहित्य, मेडिकल फर्स्ट-




एड किट, औषधे, तसेच वस्त्र, उबदार शाल, मोजे, टॉवेल यांसारख्या वस्तूंचे मनापासून संकलन करून वितरण केले. बहुतेक साहित्य हे विद्यार्थ्यांनी स्वतः घरातून, बचतीतून किंवा स्वतःहून गोळा करून दिल्यामुळे या उपक्रमाला एक विशेष भावनिक स्पर्श मिळाला.वृद्धाश्रमात पोहोचताच विद्यार्थ्यांचे ज्येष्ठ नागरिकांनी प्रेमाने स्वागत केले. मुलांनी ज्येष्ठांशी संवाद साधला, त्यांचे अनुभव ऐकले आणि त्यांच्यासोबत काही काळ घालवल्याने वृद्धाश्रमात आनंद, उत्साह आणि आत्मीयतेचे वातावरण निर्माण झाले. अनेक ज्येष्ठ रहिवाशांनी भावूक होत विद्यार्थ्यांचे कौतुक केले आणि त्यांना भरभरून आशीर्वाद दिला.या उपक्रमाबद्दल बोलताना मुख्याध्यापिका मुक्ता खटावकर यांनी सांगितले की, "लोकनेते रामशेठ ठाकूर साहेबांनी संपूर्ण आयुष्य समाजकार्याला वाहिले आहे. त्यांच्या ७५ व्या वर्षपूर्तीच्या निमित्ताने विद्यार्थ्यांनी सामाजिक जबाबदारीची जाणीव ठेवून समाजासाठी काहीतरी करण्याची शिकवण घ्यावी, हा आमचा उद्देश आहे. आजच्या उपक्रमामुळे मुलांमध्ये करुणा, संवेदनशीलता आणि सेवा यांची खरी भावना निर्माण होण्यास मदत झाली.या उपक्रमात शाळेतील विद्यार्थी, शिक्षक, पालक, व्यवस्थापन समिती यांचा उत्स्फूर्त सहभाग होता. सर्वांच्या एकत्रित प्रयत्नांमुळे वृद्धाश्रमातील रहिवाशांना व आदिवासी विद्यार्थ्यांना आवश्यक साहित्याचा मोठा आधार मिळाला. तसेच विद्यार्थ्यांची समाजाबद्दलची दृष्टी आणखी व्यापक झाली.

# गेल्या नंदा आल्या वंदा राजरोसपणे चालतो पुरवठा अधीकारी यांचा उदगीरात अवैध धंदा ........!

## मनोज गॅस एजन्सी यांच्यावर पुरवठा अधिकारी सुमित्र ईलमिले करावाई करणार का .......... ?

**दैनिक युवक आधार**

**उदगीर प्रतिनीधी ( बालाजी तेलंगे ) :** उदगीर शहरात मनोज गॅस एजन्सी हे एक नामांकीत गॅस एजन्सी आहे हा गॅस एजन्सी मालक म्हणजे एक वरिष्ठ पातळी वरील नांमाकीत व्यकती असलेला मालक व चालक आहे . यांच्या या एजन्सी मधुन अवैध रित्या गॅस वाटप होत .असुन सदर गॅस वाटप करणे मनोज गॅस एजन्सी कर्मचारी हे ग्राहाकाना वेळेवर गॅस न देता उदगीर शहरातील हॉटेल मालक व मंगल कार्यालय , याना अनेक रुपय जास्त



घेऊन अवैध रित्य गॅस विक्री , पुरवठा करतात व गॅस मागे आनेक रुपये घेतात . एवढेच नव्हेतर उदगीर शहरात जय संतोषी माता नगर व हानुमान नगर या भागात गॅस वाटप करणारा कर्मचारी हा गोर गरिब ग्राहक यांच्या कडुन आघाऊ रक्कम घेतो व एवढेच नाही तर हा व्यकतीअवैध रित्या गॅस हॉटेल मंगल कार्यालय व ईतर ठिकाणी अवैध रित्या गॅस विक्री करून आपली पोळी भाजणाचे काम करत आसतो.ही सर्व माहीती मनोज गॅस एजन्सी मालक रत्नाकर कांबळे यांना माहीती असुन सुधा अवैध रित्या गॅस विक्री चालुच आहे .मालक व पुरवठा अधिकरी यांच्या आर्शिवादानेच हा व्यकती,कर्मचारी अवैध रित्या गॅस वाटप करत व आघाऊ रक्कम घेत आहे. अशी चर्चा सुधा ग्राहक यांच्यात आहे . या बाबत आनेक संघटना व समाजीक कार्यकते यांनी पुरवठा अधिकारी सुमित्रा आण्णाराव ईलमीले यांना तक्रारी देवुन व समक्ष भेटून सुद्धा संबधीत मनोज गॅस एजन्सी वर अध्याप कोठलीही करवाई पुरवठा अधिकारी सुमित्रा ईलमीले करत नसुन पुरवठा अधिकारी हे संबधीत एजेन्सी यांच्या कडुन चिरी मिरी खाऊन गप्पा का आशी चर्चा सुधा उदगीर शहरात चालु आहे .

# चारचाकी वाहनांना आकर्षक तसेच पसंतीचे क्रमांकांसाठी इच्छुकांनी अर्ज सादर करावेत

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर :** प्रादेशिक परिवहन कार्यालय, पनवेल येथे चारचाकी वाहनांसाठी चालू असलेली एम एच 46 डीए ही मालिका संपुष्टात येणार असल्याने एम एच 46 डीएफ ही नवीन मालिका सुरु करण्यात येणार आहे.

यासाठी ज्यांना चारचाकी वाहनांना आकर्षक तसेच पसंतीचे क्रमांक विहित शुल्क भरुन हवे असतील त्यांनी 23 डिसेंबर रोजी कार्यालयीन वेळेत सकाळी 10 ते दुपारी 2.30 या दरम्यान विहित नमुन्यातील अर्जामध्ये कार्यालयाच्या खाजगी वाहन विभागात डीडी, निवासी पत्त्याचा पुरावा, ओळखपत्र, पॅनकार्डच्या साक्षांकित प्रतीसह जमा करावा, असे आवाहन सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी, पनवेल जयंत चव्हाण यांनी केले आहे.

एकाच नंबरकरीता एकापेक्षा जास्त अर्ज आल्यास त्यांची यादी 23 डिसेंबर रोजी सायंकाळी 4 वाजता कार्यालयीन नोटीस बोर्डवर लावण्यात येईल.

त्यानुसार एकाच नंबरसाठी एकापेक्षा जास्त अर्ज असतील तर त्या अर्जदारांनी त्याची नोंद घेऊन 24 डिसेंबर 2025 रोजी कार्यालयीन वेळेत दुपारी 2.30 वाजेपूर्वी त्यांच्या इच्छेप्रमाणे जास्तीच्या रकमेचा धनाकर्षण (डीडी) बंद लिफाफ्यामध्ये कार्यालयात जमा करावा अतिरिक्त धनाकर्षण कमीत कमी 301 रु.चा असावा त्यापेक्षा कमी रकमेच्या धनाकर्षण विचार केला जाणार नाही. या अर्जासाठी त्याच दिवशी दुपारी 3.30 वाजता सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी, नवीन वाहन नोंदणी विभाग यांच्या दालनात लिलाव करण्यात येईल.

दैनिक युवक आधार
हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.

daily YUVAK ADHAR
Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST-RAIGAD, Editor Bharti Santosh Amle

# नेल्सन लक्सचा नागपुरात शुभारंभ: मातृ व बाल आरोग्यसेवेला नवी दिशा देणारे प्रीमियम हॉस्पिटल

## आई आणि बाळांसाठी खास 'नेल्सन लक्स' हॉस्पिटलचे नागपुरात उद्घाटन

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी राहुल मडावी/नागपूर :** नेल्सन ग्रुपने नेल्सन लक्स – प्रीमियम मदर अँड चाइल्ड केअर हॉस्पिटलच्या भव्य उद्घाटनाची अभिमानाने घोषणा केली आहे. मातांसाठी जागतिक दर्जाचा प्रसूती अनुभव, नवजात बाळांसाठी अत्याधुनिक बालरोग सेवा तसेच आरामदायक सुविधा देणारे हे हॉस्पिटल नागपुरातील पहिलेच असे आरोग्यकेंद्र ठरणार आहे. "डेशपांडे लेआउट, सेंट्रल अव्हेन्यू येथील नेल्सन लक्स हॉस्पिटलचे उद्घाटन उद्या, रविवार, 14 डिसेंबर 2025 रोजी दुपारी 12:00 वाजता, माननीय श्री. नितीन गडकरी जी यांच्या हस्ते होणार आहे. या वेळी श्री. दत्ता जी मेघे, श्री. सागर जी मेघे आणि हिंगणा विधानसभेचे आमदार श्री. समीर जी मेघे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे."



या हॉस्पिटलच्या प्रेस कॉन्फरन्समध्ये सी.ई.ओ. डॉ. सोनलकुमार भगत यांच्यासह प्रसूतीशास्त्र, नवजात शिशुरोग (निओनॅटोलॉजी), बालरोग, वंध्यत्व उपचार (फर्टिलिटी) आणि स्त्री आरोग्य यासंबंधी वरिष्ठ तज्ज्ञ आणि सल्लागार डॉक्टरांची टीमही उपस्थित होती.

प्रेस कॉन्फरन्समध्ये बोलताना सी.ई.ओ. डॉ. सोनलकुमार भगत यांनी सांगितले,"नेल्सन लक्स हे केवळ हॉस्पिटल नाही, तर एक परिपूर्ण अनुभव आहे. मातांसह बाळांना सर्वोच्च दर्जाची वैद्यकीय सेवा देताना, त्यांना उबदार, आरामदायक आणि आलिशान वातावरण उपलब्ध करून देणे हे आमचे ध्येय आहे. आमच्या अनुभवी वैद्यकीय डॉक्टरांच्या पाठबळासह आणि अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने आम्ही मध्य भारतात मातृत्व आरोग्यसेवा नव्याने उभारण्याचा प्रयत्न करतो."

डॉ. सतीश देवपुजारी यांनी सांगितले, "सी.ए. रोडवरील नेल्सन हॉस्पिटल हे मातृ आणि बालरोग सेवेत सुधारणा करण्यासाठी तयार केले गेले आहे, जिथे वैद्यकीय कौशल्यासोबत आराम आणि सन्मान दिला जातो. आमचा उद्देश फक्त उपचार देणे नाही, तर मातांसाठी, नवजात बाळांसाठी आणि कुटुंबांसाठी संपूर्ण काळजीचा अनुभव देणे आहे."

"बियॉन्ड बर्थिंग" या संकल्पनेतून साकारलेल्या नेल्सन लक्समध्ये अत्याधुनिक वैद्यकीय तज्ज्ञता, आई-बाळांच्या वैयक्तिक गरजेनुसार आखलेली उपचार पद्धती आणि आरामदायक सुविधा एकत्रित करण्यात आल्या आहेत. ज्यामुळे प्रत्येक आई आणि बाळाला सर्वोच्च दर्जाची काळजी, लक्ष आणि आराम मिळतो.

**मातृ आणि बालरोग सेवेत नवीन मापदंड**

नेल्सन लक्सची संकल्पना मातांना सर्वांगीण, सुरक्षित आणि भावनिकदृष्ट्या समाधान देणारा मातृत्वाचा अनुभव देण्यासाठी तयार केली गेली आहे, यामध्ये पुढील सुविधा उपलब्ध आहेत:

**अत्याधुनिक वैद्यकीय सुविधा**

- लेव्हल III नियोनेटल इंटेंसिव केयर यूनिट (एनआयसीयू)
- आधुनिक लेबर डिलिव्हरी रिकव्हरी (एलडीआर) सूट्स
- मुलांसाठी स्वतंत्र बालरोग अतिदक्षता विभाग, मातांसाठी रिकव्हरी रूम्स आणि आपत्कालीन सेवा
- आधुनिक मॉनिटरिंग आणि सुरक्षा प्रणालींनी सुसज्ज उच्च-तंत्रज्ञान ऑपरेशन थिएटर्स

नवीन मातांसाठी आरामदायी सुविधा

- हॉटेलसारख्या सुविधा असलेल्या प्रीमियम रूम आणि सूट्स
- तणाव कमी करून आराम वाढवणारी शांत आणि आकर्षक अंतर्गत रचना
- प्रत्येक आईसाठी खास, वैयक्तिक अनुभव देणारी कस्टमाइज्ड प्रसूती पॅकेजेस

मातृ व बालरोग सेवांचा संपूर्ण पॅकेज

- प्रसूती सेवा आणि उच्च धोका असलेल्या गर्भधारणेची काळजी
- नवजात शिशु व बालरोग सुपर-स्पेशालिटी सेवा
- स्तनपान सल्ला, पोषण मार्गदर्शन आणि प्रसूतीनंतरची काळजी
- वंध्यत्व उपचार व महिलांच्या आरोग्यविषयक दवाखाने

नेल्सन ग्रुप बद्दल

नेल्सन ग्रुप अनेक वर्षांपासून आरोग्य क्षेत्रात विश्वासार्ह नाव आहे. मातृ व बालरोग क्षेत्रात 18 वर्षांहून अधिक काळाच्या अनुभवासह, विशेषतः बालरोग आणि नवजात शिशु काळजीत त्याची ओळख आहे. नेल्सन केवळ या क्षेत्रातील कौशल्यासाठीच नाही, तर भारतभर बालरोग आणि स्त्रीरोग सेवेत नवोपक्रम आणि बदल घडवण्यासाठीही प्रसिद्ध आहे. नेल्सन हॉस्पिटलचे डॉक्टर डॉ. सतीश देवपूजारी यांच्या मार्गदर्शनाखाली कार्य करतात, जे पेटंट्स आणि संशोधनासाठी संपूर्ण देशभर ओळखले जातात. नेल्सन लक्स या ग्रुपने प्रीमियम हॉस्पिटॅलिटी आणि जागतिक दर्जाची वैद्यकीय सेवा एकत्र करून मातृ आणि बालकल्याणासाठी नवीन मापदंड निर्माण केला आहे.

---

# अमर ठाकूर यांच्या जनसंपर्क कार्यालयाचे उद्घाटन



**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर** : भारतीय जनता पार्टीचे रोडपाली येथील अमर प्रभाकर ठाकूर यांच्या जनसंपर्क कार्यालयाचे उद्घाटन पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर आणि पनवेल पालिकेचे माजी विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे यांच्या हस्ते सोमवार 15 डिसेंबर रोजी करण्यात आले.यावेळी शिवसेनेचे जिल्हाप्रमुख रामदास शेवाळे, भाजपचे माजी नगरसेवक गणेश कडू, नितीन पाटील, अमर पाटील, अशोक मोटे यांच्यासह अनेक माजी नगरसेवक, शुभचिंतक, नागरिक उपस्थित होते. यावेळी अमर ठाकूर यांनी केलेल्या समाजसेवेचे आमदार प्रशांत ठाकूर यांनी कौतुक केले आणि त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. जनसंपर्क कार्यालयाच्या माध्यमातून नागरिकांची अधिकाधिक सेवा करायला मिळेल असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

# हनुमंत कथा कार्यक्रमाच्या भव्य मंडपाचे भूमिपूजन भक्तीमय वातावरणात

**दैनिक युवक आधार**

**सचिन बन्सोड प्रतिनिधी/जिल्हा गोंदिया :** गोंदिया खासदार श्री प्रफुल पटेल व सौ.वर्षाताई पटेल यांच्या वतीने स्थानिक धोटे बंधू महाविद्यालयाच्या परिसरात मोठ्या भक्ती भावात २१ ते २३ डिसेंबर दरम्यान भगवान हनुमंत कथा पाठ व विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. वृंदावन येथील श्री आनंदम धाम ट्रस्ट, पीठाधीश्वर सद्गुरू श्री ऋतेश्वरजी महाराज यांच्या अमृत वाणीतून हनुमंत कथेचे आयोजन करण्यात आले आहे. या धार्मिक कार्क्रमाच्या आयोजनासाठी जय्यत तयारी सुरु आहे. आज १५ डिसेंबर रोजी हजारो धर्मप्रेमींच्या उपस्थिती तिरखेडी (सालेकसा) आश्रमाचे श्रीराम ज्ञानीराम महात्यागी महाराज यांच्या यांच्या शुभहस्ते व माजी आमदार श्री राजेंद्र जैन यांच्या प्रमुख उपस्थितीत भूमिपूजन सोहळा मोठ्या भक्ती भावात पार पडला यांप्रसंगी माजी आमदार राजेंद्र जैन यांनी कार्यक्रमाची रुपरेखेची माहिती दिले तसेच हे धार्मिक कार्यक्रम शहर व जिल्ह्यातील धरप्रेमी साठी आहे त्यामुळे जनतेंनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून हनुमंत कथा पाठच्या माध्यमातून आपले धर्म जीवन साफल्य करावे असे विनंती पूर्व आवाहन केले.

**कार्यक्रमाची रूपरेषा**

२१ डिसेंबर ला दुपारी १.३० वाजता सद्गुरू श्री ऋतेश्वरजी महाराज यांच्या प्रमुख उपस्थितीत भव्य शोभा यात्रा माँ जगदंबा दुर्गा मंदिर, दुर्गा चौक पासून श्री हनुमान मंदिर सिविल लाईन येथे समापन होईल. दुपारी ३.३० ते ६ पर्यंत हनुमंत कथाचा आयोजन, रात ८ वाजता अखिल भारतीय कवी संमेलनाचे आयोजन धोटे बंधू महाविद्यालयात करण्यात आले आहे यात देशातील नामवंत व प्रसिद्ध कवि (कवि दिनेश बावराजी, कवि चिराग जैनजी, कवि




कविता तिवारीजी, कवि मनू वैशालीजी, कवि निकुंज शर्माजी) यांचा समावेश आहे. २२ डिसेंबर ला एन.एम.डी महाविद्यालय येथे दुपारी १२ ते ०२ वाजता पर्यत विद्यार्थी व युवकांमध्ये सकारात्मक ऊर्जा निर्माण करण्याकरिता युथ फेस्टिवलचे आयोजन व दुपारी ३.३० ते ६ पर्यंत हनुमंत कथा आयोजन, रात्री ८ वाजता खासदार श्री प्रफुल पटेल यांचे निवासस्थान, रामनगर येथे अहमदाबाद येथील प्रसिद्ध श्री धवन मानस द्वारा प्रस्तुत सुंदरकांड चे आयोजन करण्यात आले आहे.

२३ डिसेंबर ला दुपारी १ ते २ पर्यंत भक्तगणांना भेट, दुपारी ३.३० ते ६ पर्यंत हनुमंत कथा सायंकाळी ७.३० वाजता कोरणी घाट येथे भव्य धार्मिक व भक्तिमय वातावरणात सद्गुरु श्री गुरूजी यांच्या हस्ते दिप दान महोत्सव कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. सर्व कार्यक्रमांना खासदार श्री प्रफुल पटेल, सौ वर्षाताई पटेल व भक्तगण प्रामुख्याने उपस्थित राहणार आहेत.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी आयोजन समिती कार्यक्रमाचे संचालन व योग्य नियोजन करीत असून या हनुमंत कथा व विविध हृदयस्पर्शी व धार्मिक कार्यक्रमांना सर्वांचा सहभाग लाभावा व जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन माजी आमदार श्री राजेंद्र जैन यांनी आयोजकांच्या वतीने केले.

---

# पुनर्जन्माची चिकित्सा

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी ज्योत्सना करवाडे/ विदर्भ प्रमुख :** 'भस्मीभूतस्य देहस्य पुनरागमने कुतो' हे विधान चार्वाकाने दोन हजार वर्षापूर्वी केले. शरीराची राख होते. विश्वाच्या द्रव्यात मिळून जाते. सारा खेळ खलास होतो. जगाचे रहाटगाडगे अविरत चालूच राहते.

**डॉ. नरेंद्र दाभोलकर**

डॉ. नरेंद्र दाभोलकर पुनर्जन्माची चिकित्सा करताना म्हणतात की माणूस मरतो तेव्हा अनेक अतृप्त आशा, आकांक्षा, भावना, वासना, जबाबदाऱ्या ठेवून जातो. त्याच्यामागे राहणारे सगेसोयरे पण त्यामध्ये गुंतलेले असतात. त्यामुळे कायम वियोगाची ही कल्पना सहन होणारी नसते. त्यातूनच पुनर्जन्माच्या कल्पनेचा उदय झालेला आहे.

**परंपरा**

त्याशिवाय आपली परंपरा, धर्मकल्पना ठामपणे आत्मा मानते. माणसाने अंगावरचे कपडे बदलावेत तसा आत्मा शरीररूपी कपडे बदलतो आणि दुसऱ्या जीवात प्रविष्ट होतो. हा आत्मा अविनाशी असतो. तो शस्त्राने न मारला जाणारा, पावसाने न भिजणारा, वाऱ्याने न वाळणारा, अग्नीने न पोळणारा असतो, आपली ही परंपरा पक्केपणाने रूजलेली भावना आहे. याच्या मदतीला चौऱ्याऐंशी लक्ष योनींचा जन्म-मृत्यूचा फेरा आहेच. हा फेरा छेदून कायम नरकात जाऊन पडणारे किंवा थेट स्वर्गातली सीट रिझर्व्ह करणारे पापात्मे व पुण्यात्मे फारच थोडे. बाकीच्या पामरांना या फेऱ्यातून जाणे आहे आणि त्यामुळे पुनर्जन्मही आहे.

खरे तर या फेऱ्यात नशिबाने एकदाच मानव जन्म लाभतो. पण कुणी-कुणी महापुण्यवान असतात. त्यांना मरणोत्तर पुन्हा मानवजन्मच लाभतो. पुनर्जन्माचा दावा करणाऱ्या या व्यक्तींच्या हकिकती अधूनमधून ऐकिवात येतात. जगाच्या लोकसंख्येच्या १० टक्के असणाऱ्या हिंदू धर्मातच पुनर्जन्म मानतात. ख्रिस्ती व इस्लाम वर्ग पुनर्जन्म मानीत नाहीत. भारत देश सोडला तर इतर बौध्यधर्मीय देश सुद्धा पुनर्जन्म मानतात. राजस्थान विद्यापीठाने अशा सातशे केसेसचा अभ्यास केला, या अभ्यासातून काहीच निष्पन्न होत नाही. म्हणून त्यांनी हा विभागच मग बंद केला.

**पुनर्जन्माच्या केसेस ला प्रसिद्धी**

पुनर्जन्माच्या केसेसना आपल्या समाजात नेहमीच अफाट प्रसिद्धी मिळते. पैसा कमवायला या अफवा उपयोगी असतात. टीवी चॅनेल्स वर रात्र दिवस अश्या तथाकथित पुनर्जन्म घेतल्यालेल्याचा साक्षात्कार सुरू असतो. पारायण, भजन, कीर्तनातून पुनर्जन्म चांगला गेला पाहिजे ह्या उद्देशाने ह्या जन्मात आचार विचार, वागणूक चांगली ठेवावी म्हणजे मोक्ष प्राप्ती होते आणि पुनर्जन्मात चांगल्या राज घराण्यात जन्माला येतात अशी भलावण केली जाते.

अशा केसेसची काळजीपूर्वक तपासणी केली, तर बनावट हकिकतींचे काही दुवे हेरता येतात. पुनर्जन्माचा दावा करणारी व्यक्ती आणि तिचे हल्लीचे व पूर्वजन्मीचे कुटुंब याचा पुसटसा संबंध लक्षात येऊ शकतो. शिवाय जन्म, मृत्यू, लग्न यांच्या नोंदी, मरणोत्तर तपासणी यांचे अहवाल पाहता येतात.

**मृत व्यक्तीच्या इच्छा**

मृत व्यक्तीचे काही मागे राहिले आणि ते दुसऱ्या देखत काही काळाने प्रविष्ट होते असे मानावयास गेलो तर फारच घोटाळे होतात. मधल्या काळात ते आत्मे कोठे राहतात? हवेत भटकतात की वेताळाच्या टेकडीवर? शिवाय हे पुनर्जन्म मिळतात कोणत्या आधारावर? सध्याच्या कल्पनेप्रमाणे आधार मानावयास हवा, पूर्वसंचिताचाच, म्हणजे सगळा कर्मविपाकाचाच सिद्धांत मानावयास हवा. या जन्मीच्या पाप-पुण्याचा हिशेब होणार, त्याआधारे कुठल्या योनीत पुनर्जन्म येणार का मोक्ष मिळणार, हे ठरणार. त्यामुळे पूर्वजन्मीच्या कल्पनेला पुसटशीही मान्यता घ्यायची म्हणजे आपल्याला संचिताने घडवले. चातुर्वर्ण्य दिले. भोग दिले, हे सगळेच मानावयास हवे. पुरुषार्थी माणसाला पुर्नजन्माची कल्पना अशी फटक्यात पराधीन करून टाकते.

कधी-कधी घरातील अमुक एक व्यक्ती, आजोबा, आजी मरते आणि त्याचवेळी चार-दोन दिवसांनी सून वा नातसून बाळंत होते. तिला मुलगा झाला तर आजोबाच आणि मुलगी झाली तर आजीचा पुनर्जन्म मानला जातो, आता या तर्काला काय म्हणावे! जन्माला आलेला जीव खरे तर आईच्या उदरात नऊ महिन्यांपूर्वीच जन्माला आलेला असतो. ऑपरेशनची वा औषधाची मदत घेतली असती, तर तो आजोबा आजीच्या मृत्यू आधीही जन्माला येऊ शकला असता. आठव्या महिन्यापासूनच तो जीव जगण्यालायक होतो. (Viable Child) मग त्या जीवात आत्मा कुठला होता, इकडे तर आजोबा, आजी जिवंतच होते. पण हे साधे प्रश्न अक्कल गहाण टाकली की सुचत नाहीत. आत्मा हा जिवापेक्षा वेगळा आहे. जीवाला नव्हे तर आत्म्याला पुनर्जन्म आहे, हा युक्तिवादही म्हणून टिकत नाही. खरे तर आत्मा म्हणजे काय? त्याची वैशिष्ट्ये कोणती? याचे बुद्धिगम्य विश्लेषण अद्याप कुणीच केलेले नाही. एक तर केवळ कल्पनाशक्तीने (स्पेक्युलेशन) त्याचे वर्णन केले जाते किंवा फार तर काहीजणांच्या अनुभवाचा हवाला दिला जातो. यातली कोणतीच गोष्ट प्रत्यक्ष पाहता येत नाही. अनुभवाच्या कसोटीवर घासून पाहता टिकत नाही. म्हणूनच अशा पुनर्जन्माच्या कल्पनेबाबत मुळापासूनच नकार देणे श्रेयस्कर व योग्य आहे.



डॉ सुनिल भगत
महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती नागपूर

# निधन वार्ता प्रकाशजी शेवदा

**दैनिक युवक आधार**

**वाशिम/गजानन पवार पाटील :** येथील नगर परिषदेचे मुख्य प्रशासक तथा मुख्याधिकारी वाशीम येथील आयुडीपी कॉलनीमध्ये वास्तव्यास असलेले सतीश शेवदा यांचे वडील प्रकाशजी चंदुलालजी शेवदा यांचे वयाच्या 63 व्या वर्षी अल्पशा आजाराने दिनांक 14



डिसेंबरच्या रात्री दुःखद निधन झाले. असून त्यांच्या वाशीम येथील पद्धतीर्थ मोक्षधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या परिवारास पत्नी, भाऊ, मुलगा, मुलगी, जावई, सुना, नातू नातवंड असा बराच मोठा आप्तपरिवार आहे. त्यांच्या दुःखात निधनामुळे परिसरात हळहळ व्यक्त केल्या जात आहे.

---

# मूल्याची रुजवणूक स्वतः पासून करा : जितीनजी रहमान

**दैनिक युवक आधार**

**पाटोदा (प्रतिनिधी)** : जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था अंबाजोगाई, जिल्हा बीड व शांतीलाल मुथा फाउंडेशन, पुणे यांच्या संयुक्त विद्यमानाने आयोजित बीड तालुक्याचे "मूल्यवर्धन तालुकास्तरीय शिक्षक प्रशिक्षण टप्पा दोन" चे आयोजन दिनांक ११ डिसेंबर २०२५ रोजी बीड येथे करण्यात आलेले होते. या प्रशिक्षणासाठी बीड जिल्ह्याचे कर्तव्यदक्ष मुख्य कार्यकारी अधिकारी मा.श्री.जितीनजी रहमान साहेब उपस्थित होते. त्यांच्या हस्ते या कार्यक्रमाचे उद्घाटन झाले या प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था अंबाजोगाईचे प्राचार्य श्री. अनिलजी मुरकुटे साहेब, प्रमुख उपस्थिती प्रशिक्षण प्रमुख जेष्ठ अधिव्याख्यात्या डॉ.भगीरथी गिरी, उपशिक्षणाधिकारी श्रीमती.अंजूम शेख व बीड पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी श्री.समंदर खान साहेब उपस्थित होते. तसेच शांतीलाल मुथा



फाउंडेशनचे श्री.सचिनजी वाळुंजकर, जिल्हा समन्वयक दिपक गर्जे, तालुका समन्वयक विनोद चौरे, गणेश जाधव उपस्थित होते. या प्रसंगी आपल्या मार्गदर्शनपर संदेशामध्ये मुख्य कार्यकारी अधिकारी मा. जतिनजी रहमान म्हणाले की "कुठल्याही मूल्याची रुजवणूक करताना स्वतः पासून ती करावी" हा एक मोलाचा संदेश या प्रसंगी दिला त्याच बरोबर प्राचार्य अनिलजी मुरकुटे सर यांनी मूल्यांची रुजवणूक चार भिंती पलिकडे ही होते, याची जाणीव करून दिली तर ज्येष्ठ अधिव्याख्यात्या व प्रशिक्षण प्रमुख डॉ.भागिरथी गिरी यांनी या कार्यक्रमाच्या प्रास्ताविकामध्ये मूल्यवर्धन प्रशिक्षणाचे मुख्य गाभ्याचे विवेचन केलं. तर कार्यक्रमाचे सूत्रबद्ध संचालन श्री.अशोक सप्रे यांनी केले.

# गव्हाण विद्यालयात बाल आनंद मेळा !!

**दैनिक युवक आधार**
**जिल्हा प्रतिनिधी प्रमुख/ एम.डी.भोईर :** रयत शिक्षण संस्थेचे थोर देणगीदार माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वाढदिवसानिमित्त संस्थेच्या येथील श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ.भगत ज्युनिअर कॉलेज, गव्हाण -कोपर मध्ये विद्यार्थ्यांचा बाल आनंद मेळावा अन् व्यवसाय वृद्धीचा रम्य सोहळा रंगला.सोमवार दिनांक १५ डिसेंबर २०१५ रोजी संपन्न झालेल्या या बाल आनंद मेळयात घरगुती खाद्यपदार्थांसह,भाजीपाला,फळे व इतर गृहोपयोगी वस्तूंचा बाजार आनंदात भरला. विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे चेअरमन तथा संस्थेचे लाईफ जनरल बॉडी सदस्य अरुणशेठ भगत यांच्या शुभहस्ते या बाल आनंदमेळयाचे उत्साहात उद्घाटन करण्यात आले.अरुणशेठ भगत यांचेसह स्थानिक शाळा समितीचे सर्व सदस्य व इतर मान्यवरांनी या बाल आनंद मेळाव्यामधील विविध खाद्यपदार्थांचा आनंद लुटला. यावेळी शाळा समितीचे ज्येष्ठ सदस्य अनंताशेठ ठाकूर व विश्वनाथ कोळी,गव्हाण ग्रामपंचायतचे माजी उपसरपंच विजयनाना घरत,माजी सदस्या अॅड.योगिता भगत,ज्येष्ठ नेते जयवंतराव देशमुख,किशोर पाटील,सुधीर ठाकूर,सुहास भगत,नामदेवराव ठाकूर,चंद्रकांत म्हात्रे,विद्यालयाच्या प्राचार्या तथा संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिल सदस्या ज्योत्स्ना ठाकूर,उपमुख्याध्यापक विलासराव लेंभे,पर्यवेक्षिका शशिकला पाटील,संस्थेचे लाईफ मेंबर व जनरल बॉडी सदस्य रविंद्र भोईर,लाईफ वर्कर देवेंद्र





म्हात्रे,ज्युनिअर कॉलेज विभाग प्रमुख संजय उगले,गुरूकुल प्रमुख संदिप भोईर,ज्येष्ठ शिक्षक सागर रंधवे,राजेंद्र चौधरी आदी उपस्थित होते.

यावेळी उद्घाटनपर भाषणात बोलताना अरुणशेठ भगत म्हणाले की,लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वाढदिवसानिमित्त विद्यालयामध्ये आयोजित केलेल्या या ' बाल आनंदमेळया ' मध्ये विविध खाद्यपदार्थ,भाजीपाला व इतर वस्तूंची रेलचेल असून विद्यार्थ्यांमध्ये व्यावसायाभिमुखता, व्यवसाय व विक्री कौशल्य,संघटन कौशल्य,नियोजन,व्यवस्थापन व कार्यवाही,खरी कमाई,बाजारामूल्ये व व्यवहार ज्ञान आदी विविध कौशल्ये वृद्धिंगत होण्यासाठी अत्यंत प्रेरणादायी आणि अत्यंत अनुभवसमृद्ध असा हा उपक्रम असून ह्या बाल आनंदमेळयाचे आयोजन केल्याबद्दल त्यांनी विद्यालयाच्या प्राचार्या व सर्व सेवकांचे कौतुक केले.यावेळी बाल आनंद मेळयाच्या पोस्टरचे विमोचन मान्यवरांच्या शुभहस्ते करण्यात आले. विद्यालयाच्या प्रांगणाला प्रत्यक्ष बाजारपेठेचे स्वरूप प्राप्त झाले होते.

याप्रसंगी स्मित कुंदन मोकल या विद्यार्थ्याने लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या जीवनावर आधारित केलेल्या भाषणाने प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले.

याप्रसंगी विद्यालयाच्या वतीने रायगड विभागीय प्रश्नमंजुषा स्पर्धेत तृतीय क्रमांक प्राप्त केल्याबद्दल विद्यालयाच्या प्रश्नमंजुषा गटातील तीन विद्यार्थी सारा वैभव घरत,स्मित कुंदन मोकल व प्रतीक नाडे यांचा सन्मान करण्यात

आला.त्याचप्रमाणे अटल टिंकरिंगचा विद्यार्थी वेद घरत याच्या उपकरणाची राज्यस्तरावर निवड झाल्याबद्दल त्याचा आणि पनवेल तालुका विज्ञान प्रदर्शनामध्ये शैक्षणिक साहित्य निर्मितीत द्वितीय क्रमांक प्राप्त केल्याबद्दल त्यांचाही मान्यवरांच्या शुभहस्ते पुष्पगुच्छ व सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.

या बाल आनंद मेळाव्यामधील विविध वस्तू व पदार्थांचा विद्यार्थी,शिक्षक,स्थानिक शाळा समितीतील सर्व सदस्य व पालकांनीही मनसोक्त आनंद लुटला.सर्व मान्यवरांसह पालकांनी ' सेल्फी पॉईंट ' मधून या बाल आनंद मेळाव्याच्या स्मृती मोबाईल मध्ये जतन करून ठेवण्यासाठी विद्यार्थ्यांचीही झुंबड उडाली. यावेळी झालेल्या उद्घाटन समारंभाचे सूत्रसंचालन ज्येष्ठ शिक्षक सागर रंधवे यांचेसह दर्शना माळी व हर्षला पाटील यांनी केले.

## पालोद येथे हतबल शेतकऱ्याने जीवनयात्रा संपवली कर्ज व नापिकिने घेतला बळी

**दैनिक युवक आधार**
**योगेश पालोदकर/ सिल्लोड :** तालुक्यातील पालोद परिसरात शेतीत होणाऱ्या अपार नुकसानीमुळे आणि आर्थिक विवंचनेतून एका तरुण शेतकऱ्याने टोकाचे पाऊल उचलल्याची अतिशय दुःखद घटना समोर आली आहे.



सततची नापिकी आणि वाढलेल्या कर्जाच्या ओझ्याला कंटाळून राजेश पांडुरंग लांडगे (वय ४२) या शेतकरी पुत्राने ११ डिसेंबर रोजी विषारी द्रव्य प्राशन करून आपली जीवनयात्रा संपवण्याचा प्रयत्न केला.

लांडगे यांच्या कुटुंबीयांना हा प्रकार कळताच त्यांनी त्यांना तत्काळ सिल्लोड येथील शासकीय रुग्णालयात दाखल केले. मात्र, त्यांची प्रकृती चिंताजनक असल्याने पुढील उपचारांसाठी त्यांना छत्रपती संभाजीनगर येथे हलवण्यात आले. दुर्दैवाने, उपचारादरम्यान रविवारी त्यांचा मृत्यू झाला. या घटनेने पालोद परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

राजेश लांडगे यांच्या नावे पालोद शिवारात गट क्रमांक २४ मध्ये ४० आर शेतजमीन होती. कुटुंबातील सदस्यांनी दिलेल्या माहितीनुसार, शेतीत केलेला खर्च आणि बँकेचे कर्ज यामुळे ते गेल्या अनेक दिवसांपासून प्रचंड नैराश्यात होते.

शेतीतील अनिश्चिततेमुळे झालेली आर्थिक कोंडी त्यांना असह्य झाली. लांडगे यांच्या पश्चात त्यांचे आई-वडील, पत्नी आणि दोन लहान मुले असा परिवार आहे, ज्यांच्यावर आता मोठे संकट कोसळले आहे.

सिल्लोड ग्रामीण पोलिसांनी या प्रकरणी आकस्मात मृत्यूची नोंद केली असून, पुढील तपास सुरू आहे.

या घटनेने शेतकरी कुटुंबांच्या व्यथा पुन्हा एकदा प्रकर्षाने समोर आल्या आहेत

## रेवदंड्यात भाजप वाढतच नाही; तेच तेच चेहरे, नवा रक्तसंचार शून्य!

**दैनिक युवक आधार**
**निलेश फुंडे/रेवदंडा प्रतिनिधी :** केंद्रात–राज्यात सत्तेचा डंका, पण रेवदंड्यात संघटन ठप्प; तळागाळातील कार्यकर्त्यांना संधी न मिळाल्याने पक्ष विस्ताराला ब्रेक.केंद्रात भारतीय जनता पक्षाचे सरकार, राज्यात भाजप सहभागी असलेली सत्ता; पण रेवदंड्यात मात्र पक्ष विस्ताराचा वेग शून्यावरच अडकलेला दिसतो. गावोगावी होणाऱ्या राजकीय चर्चांमध्ये एकच प्रश्न उच्चारला जातो . "सत्ता दिल्ली–मुंबईत भाजपची, पण आपल्या रेवदंड्यात पक्षाचा झेंडा अजूनही का फडकत नाही?" स्थानिक पातळीवर वर्षानुवर्षे तेच तेच पदाधिकारी व कार्यकर्ते पुढे दिसतात, नवीन चेहऱ्यांना, तरुणांना आणि महिलांना संघटनेत जागा न मिळाल्याने पक्ष वाढत नसल्याची कुजबुज



आता उघड नाराजीत बदलत आहे.रेवदंड्यातील भाजपची रचना पाहिली तर सभागृहात, व्यासपीठावर आणि पॅनेलमध्ये कायम तीच मंडळी ठाम बसलेली दिसतात. त्याच नावांभोवतीच पदवाटप, दौरे, प्रचारयोजना फिरताना पाहून तळागाळातील कार्यकर्त्यांचा उत्साह गळून पडत आहे. "आम्ही वर्षानुवर्षे बूथवर काम करायचं, आणि निवडणुकीच्या तोंडावर तिकीट मात्र त्याच ठराविक लोकांनाच – मग पक्षविस्तार कसा होणार?" असा सवाल अनेक कार्यकर्ते बंद दरवाज्याआड करताना ऐकू येतो.केंद्र–राज्यात सत्ता असताना त्या राजकीय शक्तीचा फायदा रेवदंड्यासारख्या मतदारसंघात व्हायचा असेल, तर स्थानिक संघटनात नवा रक्तसंचार करणे आवश्यक आहे. परंतु, कार्यकर्त्यांच्या मते नवे चेहरे पुढे आणण्याऐवजी तेच जुने गट, गटबाजी आणि गटनेते यांच्याभोवती संपूर्ण भाजप फिरत असल्याने सर्वसामान्य मतदारांमध्येही "भाजप आला तरी बदलणार काय?" अशी निराशा वाढली आहे. स्थानिक प्रश्नांवर लढा देणे, ग्रामपंचायत–नगरपरिषद स्तरावर सतत उपस्थिती ठेवणे, युवकांना जबाबदारी देणे या मूलभूत राजकीय गोष्टींकडे दुर्लक्ष झाले, तर फक्त 'केंद्रात आपले सरकार' हा नारा पुरेसा ठरत नाही, हे वास्तव आज रेवदंडा दाखवत आहे. संघटनेला लागणारी 'शॉक थेरपी'राजकीय जाणकारांच्या मते, रेवदंड्यातील भाजपला सध्या सर्वात जास्त गरज आहे ती संघटनेतील बदलाची. जुन्या, निष्क्रिय पदाधिकाऱ्यांचा आढावा घेऊन तळागाळात काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना पुढची रांग द्यावी.युवक, महिला, व्यावसायिक, मत्स्यव्यवसाय व पर्यटन क्षेत्राशी जोडलेल्या नव्या नेतृत्वाला जागा करून दिली, तरच पक्षाला नवा चेहरा व नवे प्रश्न मिळतील.वर्षानुवर्षे तेच चेहरे आणि त्या त्या गटांचा ताबा राहिला, तर रेवदंड्यात भाजप 'नावापुरता' पक्ष राहण्याचा धोका वाढतो, अशी चर्चा पक्षाच्या घरातच चालू आहे. स्थानिक कार्यकर्त्यांचे म्हणणे आहे की, रेवदंड्याला केवळ निवडणुकीच्या तोंडावर आठवण काढून भागणार नाही; नियमित संपर्क, ठोस विकासकामांचा पाठपुरावा आणि नेतृत्वात बदलाशिवाय भाजपचा खरा विस्तार होणार नाही. "तेच तेच कार्यकर्ते, तेच तेच पदाधिकारी आणि तेच तेच समीकरणे बदलली नाहीत, तर रेवदंड्यात भाजप वाढत नाही ही मथळी पुढची अनेक वर्षेही बदलणार नाही," असा इशारा आता तळागाळातून दिला जात आहे.

## लोकनेते दि. बा. पाटील २७ गाव संघर्ष समितीने लोकनेते रामशेठ ठाकूर यांची भेट; दिबांच्या नावासाठी सदैव पाठीशी

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी)** : नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला लोकनेते दि. बा. पाटील यांचे नावा संदर्भात मंगळवारी लोकनेते दि. बा. पाटील २७ गाव संघर्ष समितीने आपली भूमिका पुन्हा एकदा स्पष्ट करत रायगड जिल्ह्याचे माजी खासदार आणि लोकनेते दि. बा पाटील नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ सर्व पक्षीय कृती समितीचे उपाध्यक्ष लोकनेते रामशेठ ठाकूर यांची भेट घेतली. या भेटीदरम्यान सुरुवातीपासूनच विमानतळ प्रकल्पबाधित २७ गाव संघर्ष समिती ही लोकनेते रामशेठ ठाकूर आणि दि. बा. पाटील नामकरण कृती संघर्ष समितीच्या बरोबर असून, पुढेही ठामपणे त्यांच्या पाठीशी उभी राहणार असल्याचा निर्धार समितीच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला.या प्रसंगी २७ गाव संघर्ष समितीचे अध्यक्ष नंदराज मुंगाजी, सचिव प्रेम पाटील, उपाध्यक्ष सी. टी. पाटील, प्रवक्ते रुपेश धुमाळ, सहसचिव चेतन डाऊर, संपर्क प्रमुख किरण पवार, पद्माकर पाटील, समीर केणी तसेच अन्य पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते.



या भेटीबाबत समितीचे सचिव प्रेम पाटील यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना सांगितले की, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पासाठी आपल्या जमिनी देणाऱ्या २७ गावांतील प्रकल्पग्रस्तांच्या मुलांना विमानतळाशी संबंधित विविध प्रशिक्षण मिळावे, यासाठी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी उलवे परिसरात आवश्यक जागा उपलब्ध करून दिली आहे. गेल्या चार महिन्यांपासून उलवे नोड येथील सेक्टर १२ मधील रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलमध्ये स्थानिक प्रकल्पग्रस्तांच्या मुलांना विमानतळाशी संबंधित प्रशिक्षण दिले जात आहे. या महत्त्वपूर्ण सहकार्याबद्दल आभार व्यक्त करण्यासाठीच आज ही भेट घेण्यात आल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

प्रेम पाटील पुढे म्हणाले की, संपूर्ण २७ गाव संघर्ष समिती ही लोकनेते दि. बा पाटील नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ सर्व पक्षीय कृती समितीच्या पाठीशी खंबीरपणे उभी आहे.

दरम्यान, लोकनेते रामशेठ ठाकूर यांनीही या भेटीत नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला लोकनेते दि. बा. पाटील यांचेच नाव दिले जाईल, हे पुन्हा एकदा ठामपणे स्पष्ट केल आहे.

## प्रश्नमंजुषा स्पर्धेत गव्हाण हायस्कूलचा तिसरा क्रमांक !!

**दैनिक युवक आधार**
**जिल्हा प्रतिनिधी प्रमुख/एम.डी. भोईर** : रयत शिक्षण संस्थेच्या कर्मवीर विद्याप्रबोधिनी अंतर्गत रायगड विभागीय प्रश्नमंजुषा स्पर्धा न्यू इंग्लिश स्कूल व कनिष्ठ महाविद्यालय डोळखांब,ता. शहापूर येथे बुधवार दिनांक १० डिसेंबर २०२५ रोजी संपन्न झाल्या. या प्रश्नमंजुषा स्पर्धेमध्ये रायगड विभागातील २५ शाळा सहभागी झाल्या होत्या. विद्यार्थ्यांच्या बुद्धिमत्तेला चालना देणारी आणि त्यांच्यातील सामान्य ज्ञानाची परीक्षा घेणारी अशीही प्रश्नमंजुषा स्पर्धा दरवर्षी नेहमीच उत्साहाने संपन्न होत असते. यामध्ये सामान्य माहिती,ज्ञान व विज्ञान, खगोल व भूगोल, जग, भारत, महाराष्ट्र, क्रीडा व क्रीडापटू, महत्त्वाच्या व्यक्ती, महत्त्वाच्या ऐतिहासिक घटना आणि घडामोडी, कर्मवीर अण्णा व महाराष्ट्रातील समाज सुधारक, बझर राउंड अशा ११ घटकांवर आधारित प्रश्न विचारून प्रश्नमंजुषा स्पर्धा घेतली जाते.



शैक्षणिक वर्ष २०२५- २६ मध्ये सदर प्रश्नमंजुषा स्पर्धा ही रयत शिक्षण संस्थेचे न्यू इंग्लिश स्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, डोळखांब येथे बुधवार दि. दहा डिसेंबर रोजी आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत गव्हाण हायस्कूलच्या विद्यार्थ्यांनी बाजी मारत तृतीय क्रमांक पटकावला. यात सहभागी झालेले विद्यार्थी स्मित कुंदन मोकल सारा वैभव घरत आणि प्रतीक प्रशांत नाडे या तिघांनीही विचारलेल्या प्रश्नांची अचूक उत्तर देत इतर शाखांना मागे टाकत प्रश्नमंजुषा स्पर्धेत पहिल्या तीन क्रमांकामध्ये स्थान मिळवले.या विद्यार्थ्यांना विभागप्रमुख सौ. दर्शना माळी यांनी मार्गदर्शन केले तर श्री विशांत ठाकूर सर यांनी विद्यार्थ्यांसोबत जाऊन त्यांचे मनोबल वाढविले.

स्पर्धेच्या बक्षीस वितरण समारंभात प्रसंगी रायगड विभागीय अधिकारी श्री. एम के कोंगेरे सर,सहाय्यक विभागीय अधिकारी श्री. व्ही. यु.जगताप सर, डोळखांब स्कूल कमिटीचे ज्येष्ठ सदस्य श्री विकास भाई चौधरी, श्री नंदूशेठ डोहळे, श्री चंद्रकांत अधिकारी, डोळखांब शाखेचे प्राचार्य श्री. सी.जी.पाटील सर आणि मान्यवर यांच्या हस्ते रोख रकमेचे पारितोषिक, प्रमाणपत्र आणि मेडल देऊन गुणगौरव करण्यात आला. गव्हाण विद्यालयाच्या प्राचार्या सौ.ज्योत्स्ना ठाकूर मॅडम,उपमुख्याध्यापक श्री. विलासराव लेंभे सर, पर्यवेक्षिका सौ शशिकला पाटील, संस्थेचे लाईफ मेंबर श्री. रविंद्र भोईर सर , लाइफ वर्कर श्री. देवेंद्र म्हात्रे सर आणि सर्व शिक्षक वृंद यांनी या विजयी झालेल्या तिन्ही विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले.

## मनोज जरागें पाटील यांच्या दौऱ्यानंतर खांदा कॉलनीत मराठा व्होट बँक सक्रिय व्होट बँक निर्णायक ठरण्याची शक्यता

**दैनिक युवक आधार**
**राजेंद्र कांबळे** : खांदा कॉलनीत प्रभाग 15 मध्ये निवडणूकीचे बिगूल वाजल्यानंतर महायुती व महाविकास आघाडी या दोन्ही आघाडीतून तिकीट मागणीसाठी इच्छुकांनी जोरदार फिल्डीग लावल्याचे पहावयास मिळत आहे अनुसूचित जाती साठी राखीव असलेल्या प्रवर्गातून महायुतीकडून एकनाथ गायकवाड तर महाविकास आघाडी कडून महादेव वाघमारे यांची उमेदवारी निश्चित असल्याचे मानले जात असून त्यांनी आपल्या प्रचाराला देखील सुरूवात केली आहे उरलेल्या तीन जागा साठी आघाडी व महायुती मध्ये रस्सीखेच असल्याचे दिसून येत आहे जवळपास 26 हजार मतदार संख्या असलेल्या या प्रभागात मराठा मतदार मोठ्या संख्या असल्याने उमेदवारांची निवड करताना यंदा पक्षश्रेष्ठी कशा प्रकारे निकष लावतील हे सांगता येत नाही त्यातच मनोज जरागें पाटील यांच्या दौऱ्यानंतर मराठा व्होट बँक मोठ्या प्रमाणात सक्रिय झाल्यानंतर दोन्ही बाजूंनी यंदा मराठा उमेदवारांना प्राधान्य मिळणार असल्याचे संकेत मिळत आहेत मराठा मतदार 8 ते 10 हजारांच्या आसपास तर दलित मतदार 3 ते 4 हजारांच्या आसपास असलेल्या या प्रभागात दोन्ही मतांची गोळा बेरीज करणारे उमेदवार पक्षश्रेष्ठी कडून शोधले जात असल्याची चर्चा आहे मनोज जरागें पाटील यांच्या दौऱ्यानंतर मराठा व्होट बँक मोठ्या प्रमाणात सक्रिय झाल्यानंतर महायुती व महाविकास आघाडी या दोन्ही बाजूंनी उमेदवार निवडताना खांदा कॉलनीतल विविध सामाजिक संघटनेशी चर्चा करून उमेदवार निवडले जाणार असल्याचे संकेत मिळत आहेत

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

## थोडक्यात

### मजुरीचे पैसे मागितल्याने अपंग मजुराला अमानुष मारहाण; कोल्हा गावातील धक्कादायक प्रकार

**दैनिक युवक आधार**

**तालुका प्रतिनिधी/प्रकाश गवारे :** शेतीत काम करूनही मजुरीचे पैसे न दिल्याने अपंग मजुरावर अमानुष मारहाण झाल्याची धक्कादायक घटना नांदेड जिल्ह्यातील मुदखेड तालुक्यातील कोल्हा गावात घडली आहे.

सटवा तुळशीराम गवाले यांनी लक्ष्मण काळे यांच्या शेतात मजुरीचे काम केले होते. मात्र काम पूर्ण झाल्यानंतरही मजुरीचे पैसे न मिळाल्याने सटवा गवाले पैसे मागण्यासाठी गेले असता, लक्ष्मण काळे यांनी त्यांना बेदम मारहाण केल्याचा आरोप आहे.

या मारहाणीत अपंग मजूर गंभीर जखमी झाला असून त्याच्यावर सध्या उपचार सुरू आहेत. घटनेनंतर पीडिताने दिलेल्या तक्रारीवरून मुदखेड पोलीस ठाण्यात लक्ष्मण गोविंदराव काळे यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक धीरज चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असून, या घटनेमुळे परिसरात संताप व्यक्त होत आहे.

### एरंडोलचे कुस्तीगीरांची राष्ट्रीय स्तरावर निवड




**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी स्वप्निल पाटील एरंडोल** : एरंडोल येथील गुरु हनुमान कुस्तीगीर संस्थेच्या विद्यार्थ्यांनी भरघोस यश संपादन केले.गुरु हनुमान कुस्तीगीर संस्थेच्या प्रेरणा अनिल मराठे हिची 62 किलो वजन गटात राष्ट्रीय स्तरावर कुस्ती स्पर्धेसाठी तर सुजल अनिल भोई याची 55 किलो ग्रीक रोमन वजन गटात राज्यस्तरावर कुस्ती स्पर्धेसाठी निवड करण्यात आली याबद्दल संस्थाअध्यक्ष भानुदास आरखे उपाध्यक्ष पंकज पाटील,अनिल मराठे ,दिलीप सोनवणे यांचे मार्गदर्शन लाभले तसेच प्रेरणा व सुजल यांचा सत्कार केला.या निवडीमुळे आमदार अमोल पाटील, एडवोकेट किशोर काळकर ,प्राध्यापक मनोज पाटील आनंद दाभाडे,पंकज पाटील,संजय काबरा संस्थेचे सर्व संचालक मंडळ मान्यवरांसह परिसरात सर्वांकडून कौतुक करण्यात येत आहे

### मुदगल येथे पशुसंवर्धन शिबीरचे आयोजन



**दैनिक युवक आधार**

**अशोक नवघरे/पाथरी :** तालुक्यातील मुदगल येथे पाथरी पंचायत समिती पशुसंवर्धन विभागाच्यावतीने व पशुवैद्यकीय दवाखाना वाघाळा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित शिबीर आयोजित करण्यात आले आहे आज पशुपालकांनी दि १७ डिसेंबर रोजी सकाळी ९ ते १० वाजता या शिबिरात सहभागी होवून पशुवंधत्व निवारण करण्यासाठी पशुची तपासणी तज्ज्ञ पशुवैद्यकीय अधिकारी मार्फत उपचार करून घ्यावेत असे आवाहन करण्यात आले आहे

### बनावट मदय वाहतुकीवर उत्पादन शुल्क विभागाची कारवाई

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर** : राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क पनवेल ग्रामीण विभाग यांनी नाताळ आणि नवीन वर्षाच्या पार्श्वभूमीवर बनावट मदय वाहतुकीवर कारवाई केली. या प्रकरणी जयवंत दत्तू भोईर (वय 38 राहणार पडघे) याच्यावर गुन्हा दाखल करून त्याला अटक करण्यात आली. 14 डिसेंबर रोजी तळोजा पोलीस ठाण्याच्या हद्दीत शिवम अपार्टमेंट, सेक्टर 16, घोटगाव रोडवर तळोजा या ठिकाणी उत्पादन शुल्क विभागाने सापळा रचला. एका चार चाकी वाहनांमध्ये बनावट विदेशी मद्याच्या 144 बाटल्या आणि एक चार चाकी वाहन असा एकूण दोन लाख 58 हजार 120 रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करून आरोपी जयवंत भोईर याला ताब्यात घेतले. त्याच्याकडे केलेल्या चौकशीत सदरचे मदय जवळच असलेल्या फ्लॅटमधून आणल्याचे सांगितले. त्या ठिकाणी छापा टाकून बनावट विदेशी मद्याच्या वेगवेगळया ब्रँडच्या 250 बाटल्या असा एकूण 80 हजार 270 किमतीचा मुद्देमाल जप्त केला. दोन्ही ठिकाणी मिळून 3 लाख 38 हजार 390 रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करून जयवंत भोईर याला अटक करण्यात आली. ही कारवाई पनवेल ग्रामीण विभाग अनिल बिराजदार दुय्यम निरीक्षक, अजित बडदे, सुरेश झगडे, गैनीनाथ पालवे, सचिन कदम, ऋषिकेश भोगे यांनी पार पाडली.

### नातेवाइकांनी मारला दागिन्यांवर डल्ला

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (वार्ताहर) :** घरी पाहुणे म्हणून राहावयास आलेल्या नातेवाइकांनी दागिने चोरून नेल्याची घटना विचुंबे येथे घडली. याप्रकरणी खांदेश्वर पोलिस ठाण्यात दोघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. राधिका चौहान या विचुंबे येथे राहत असून त्यांचे दोन नातेवाईक त्यांच्या घरी आले होते. त्यांनी जेवण करून घरी मुक्काम केला. दुसऱ्या दिवशी सकाळी राधिका उठल्या असता त्यांना घरातील साहित्य विस्कटलेले दिसले. रोख रक्कम १५ हजार, सोन्याचे दागिने, चांदीच्या अंगठ्या, मोबाईल, मनगटी घड्याळ, एटीएम कार्ड सापडून आले नाहीत. त्यामुळे दोघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

# नॅशनल हेराल्ड प्रकरणी भाजपाचा खोटा अजेंडा उघड

■ सोनियाजी व राहुलजी गांधींची बदनामी करणाऱ्या मोदींनी जाहीर माफी मागावी: हर्षवर्धन सपकाळ
■ महानगरपालिका निवडणुकीत आघाडीचा निर्णय स्थानिक पातळीवर, २४ व २५ डिसेंबरला राज्य पार्लमेंटरी बोर्डाच्या बैठकीत उमेदवारांवर शिक्कामोर्तब करणार
■ मंत्री माणिकराव कोकाटेंना एक न्याय व राहुल गांधी व सुनिल केदारांना दुसरा न्याय का, कोकाटेंची हकालपट्टी कधी करणार?




**दैनिक युवक आधार**

**मुंबई / प्रतिनिधी :** नॅशनल हेराल्ड प्रकरणी न्यायालयाने दिलेला निर्णय भारतीय जनता पक्षाच्या खोटारडेपणाचा बुरखा फाडणारा आहे. केवळ सोनियाजी गांधी व राहुलजी गांधी यांना बदनाम करण्यासाठी रचलेले एक कुंभाड असल्याचे आज उघड झाले. ईडी सारख्या सरकारी यंत्रणांच्या माध्यमातून विरोधी पक्षांचा आवाज दडपण्याचा भाजपाचा अजेंडा आहे. न्यायालयाच्या निर्णयाने दूध का दूध पाणी का पाणी झाले असून पंतप्रधान नरेंद्र मोदी व भारतीय जनता पक्षाने सोनियाजी व राहुलजी यांची नाहक बदनामी केल्याबद्दल जाहीर माफी मागावी, अशी मागणी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केली आहे.

टिळक भवन येथे पत्रकार परिषदेत बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ पुढे म्हणाले की, नॅशनल हेराल्ड ही कंपनी स्वातंत्र्य चळवळीच्या वेळी ब्रिटिशांविरोधात लढताना एक अजेंडा चालवण्यासाठी देशप्रेमातून स्थापन केलेली संस्था आहे. या संस्थेच्या स्थापनेसाठी स्वातंत्र्य सैनिकांनी स्वतः पैसे दिले होते. ही संस्था एक वर्तमान पत्र चालवत होती व ना नफा तत्वाव या संस्थेचे काम चालत होते व आहे. स्वातंत्र्यानंतरच्या काळात या संस्थेत काम करणाऱ्या पत्रकार, कर्मचारी यांचे पगार देण्याचा प्रश्न उद्भवला तेव्हा काही व्यवहार झाले पण त्यातून कोणत्याही सभासदाला लाभांश वगैरे आर्थिक लाभ झालेला नाही. पण मनी लाँडरिंग झाल्याचा आरोप करत भाजपाने खोटे गुन्हे दाखल करण्यास तपास यंत्रणाना भाग पाडले. सोनियाजी व राहुलजी यांना तासनतास चौकशीच्या नावाखाली त्रास देण्यात आला. आज भाजपाचा खोटेपणा उघड झाला आहे, असेही सपकाळ म्हणाले.

**महानगरपालिका निवडणुकांच्या रणनितीसाठी बैठक.**

महानगरपालिका निवडणुकीच्या रणनितीसाठी काल व आज दोन दिवस टिळक भवन येथे बैठक संपन्न झाली. यावेळी विधिमंडळ काँग्रेस पक्षाचे नेते विजय वडेट्टीवार, काँग्रेस कार्य समितीचे सदस्य नसीम खान, प्रदेश उपाध्यक्ष संघटन व प्रशासन ॲड. गणेश पाटील, प्रदेश उपाध्यक्ष मोहन जोशी, अल्पसंख्याक विभागाचे अध्यक्ष वजाहत मिर्झा, प्रदेश सरचिटणीस गुरविंदरसिंग बच्चर, यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते. बैठकीनंतर प्रसार माध्यमांशी बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष म्हणाले की, राज्यातील २८ महानगरपालिकांच्या निवडणुकांच्या रणनितीवर या बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली आहे. मुंबई महानगरपालिकेसंदर्भात स्वतंत्र चर्चा करण्यात येईल. उद्यापासून इच्छुक उमेदवारांच्या जिल्हा पातळीवर मुलाखती होतील व त्यानंतर २५ व २६ डिसेंबर रोजी राज्य पार्लमेंटरी बोर्डाच्या बैठकीत उमेदवार निश्चित केले जातील. महानगरपालिका निवडणुकीतही आघाडी करण्याचे अधिकार स्थानिक नेतृत्वाला देण्यात आले आहेत. ज्या समविचारी पक्षांचे आघाडीसाठी प्रस्ताव येतील त्यावर निर्णय घेतला जाईल असे सपकाळ यांनी सांगितले.

**मंत्री माणिकराव कोकाटेंची हकालपट्टी करा..**

महायुती सरकारमधील क्रीडामंत्री माणिकराव कोकाटे यांना सदनिका घोटाळ्याप्रकरणी २ वर्षांची शिक्षा जिल्हा न्यायालयानेही कायम ठेवली आहे पण सरकार कोकाटेंना वाचवण्यासाठी आणखी संधी देईल. राहुलजी गांधी व सुनिल केदार यांना शिक्षा होताच २४ तासात त्यांचे खासदारकी व आमदारकी रद्द केली होती पण माणिकराव कोकाटेंना मात्र सरकार वाचवत आहे. सत्ताधारी पक्षातील लोकांना एक न्याय व विरोधी पक्षातील लोकांना दुसरा न्याय लावला जात आहे. सरकारने तात्काळ माणिकराव कोकाटेंची हकालपट्टी करावी अशी मागणी सपकाळ यांनी केली.

## लोकनियुक्त सरपंच माननीय अमोल पाटील यांना आदर्श सरपंच पुरस्काराने सन्मानित

**दैनिक युवक आधार**

**वार्ताहर** : पाचुंब्री तालुका शिराळा येथील लोकनियुक्त युवा सरपंच माननीय अमोल पाटील यांना कराड तालुका कुस्ती संघ कला क्रीडा सांस्कृतिक ट्रस्ट यांच्या संकल्पनेतून १५ नोव्हेंबर २०२५ रोजी कुशल कुस्ती संघटक पै. तानाजी चवरे (आप्पा) वाढदिवस उत्सव समिती यांच्यावतीने आदर्श सरपंच पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

=अमोल पाटील यांना राजकीय ,सामाजिक व शैक्षणिक क्षेत्राची आवड असल्यामुळे पहिल्या पाच वर्ष गावचे उपसरपंच पदभार सांभाळताना अहोरात्र गावच्या विकासासाठी काम केले. गावच्या नागरिकांनी पुढील पाच वर्षासाठी पाचुंब्री गावचे लोकनियुक्त सरपंच पदासाठी निवडून दिले. गावातील नागरिकांनी दिलेल्या संधीचे सोने करून पाचुंब्री गावचा



सर्वांगीण विकास करून शिराळा तालुक्यात नावलौकिक वाढवण्याचे काम केले. सर्वांगीण गावच्या विकासाच्या कामामुळे कराड तालुका कुस्ती संघ कला क्रिडा सांस्कृतिक ट्रस्ट महाराष्ट्र राज्य यांच्या संकल्पनेतून अमोल पाटील यांना आदर्श सरपंच म्हणून सन्मानित करण्यात आले .पाचुंब्री गावातील व शिराळा तालुक्यातील मार्गदर्शक,हितचिंतक, मित्रपरिवार यांनी अमोल पाटील यांचे कौतुक करून त्यांना शुभेच्छा दिल्या.

## अवैध वाळू वाहतूक करणाऱ्या हायवा टीप्परच्या धडकेत संतोष टाक यांचा मृत्यू

**दैनिक युवक आधार**

**मुदखेड (प्रतिनिधी): प्रकाश गवारे :** मुदखेड–बारड रोडवरील सिता नदीजवळील वळणावर आज सकाळी अवैध वाळू वाहतूक करणाऱ्या भरधाव हायवा टीप्परने मोटारसायकलस्वार संतोष टाक यांना जबर धडक दिल्याची धक्कादायक घटना घडली.

या अपघातात संतोष टाक यांच्या दोन्ही पायांवर टीप्परचे चाक चढल्याने ते गंभीर जखमी झाले.

अपघातानंतर तातडीने



त्यांना उपचारासाठी नांदेड येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले.

मात्र, उपचार सुरू असतानाच डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले.

या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत असून नागरिकांमध्ये तीव्र संतापाची भावना आहे.

दरम्यान, अवैध वाळू वाहतुकीमुळे परिसरात अपघातांच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याचा आरोप स्थानिक नागरिकांनी केला आहे.

संबंधित हायवा टीप्पर चालकाविरोधात कडक कारवाई करावी, तसेच अवैध वाळू वाहतुकीवर तात्काळ बंदी घालावी, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

## कु.सायली खताळे हिची महाराष्ट्र कबड्डी संघात निवड

**दैनिक युवक आधार**

**उत्तर महाराष्ट्र विभागीय संपादक / विनोद गायकवाड :** विस्डम इंटरनॅशनल स्कूल अँड अचीव्हर्स ज्युनिअर कॉलेज निफाड येथील विद्यार्थिनी कबड्डीपटू सायली हिरामण खताळे हिची महाराष्ट्र संघात निवड झाली असून कबड्डी संघातील रेडर म्हणून महत्त्वाची भूमिका पार पाडली आहे .अहिल्यानगर येथे १०ते १२/ ११/ २०२५ दरम्यान झालेल्या सतरा वर्षाच्या आतील राज्यस्तरीय झालेल्या मुलींच्या कबड्डी स्पर्धेत संघाला सिल्वर मेडल मिळाले असून सेमी फायनल मध्ये सायली ची ३.पॉईटची रेड विशेष आकर्षण ठरली असुन , संभाजीनगर संघाविरुद्ध तिने उत्तम खेळ खेळला



असून कोल्हापूर सांघाविरुद्ध फायनल झाली होती मुलींच्या कबड्डी स्पर्धेत मुंबई विभाग, पुणे कोल्हापूर, अमरावती, लातूर ,संभाजीनगर , नाशिक ,नागपूर अशा राज्यातील ८ विभागांनी सहभाग घेतला होता, यात नाशिक ग्रामीणच्या सायली खताळे, अन्वी नागरे, आरती घोटेकर,सेजल काकडे यांनी अतिशय उत्तम कामगिरी खेळात केले असून प्रशिक्षक गणेश पवार यांचे त्यांना मार्गदर्शन लाभले आहे.

## पंचायत समिती श्रीवर्धन येथे CMEGP–PMEGP योजनांची माहिती कार्यशाळा संपन्न

**दैनिक युवक आधार**

**श्रीवर्धन तालुका प्रतिनिधी/ अनिकेत मोहित :** महाराष्ट्र भूषण डॉ. नानासाहेब धर्माधिकारी सभागृह पंचायत समिती श्रीवर्धन येथे जिल्हा उद्योग केंद्र, रायगड–अलिबाग व उमेद (महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान) यांच्या संयुक्त विद्यमाने मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम (CMEGP) व प्रधानमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम (PMEGP) या योजनांबाबत शहरी व ग्रामीण भागातील नव्या सूक्ष्म व लघु उद्योगांना आर्थिक सहाय्य देऊन स्वयंरोजगाराला चालना देण्यासाठी माहितीपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमात CMEGP योजनेचे मुख्य तपशील उपस्थितांना सविस्तरपणे समजावून सांगण्यात आले. योजनेचा उद्देश व्यापक रोजगारनिर्मिती करणे, तरुणांमध्ये उद्योजकतेला चालना देणे आणि पाच वर्षांत एक लाख सूक्ष्म व लघु उद्योग स्थापन करणे हा आहे. उत्पादन क्षेत्रासाठी प्रकल्प खर्च मर्यादा ₹५० लाखांपर्यंत तर सेवा व



कृषी-आधारित क्षेत्रांसाठी ₹२० लाखांपर्यंत ठेवण्यात आली आहे.

अर्जदार महाराष्ट्राचा रहिवासी, किमान १८ वर्षांचा असणे आवश्यक असून यापूर्वी तत्सम सरकारी अनुदान योजनांचा लाभ घेतलेला नसावा. प्रकल्पाच्या स्वरूपानुसार शैक्षणिक निकष लागू होतात. या योजनेअंतर्गत बँक कर्जासोबत सरकारी अनुदानाचे संयोजन दिले जाते. अर्जदाराच्या श्रेणीनुसार (सर्वसाधारण/विशेष – SC/ST, महिला, माजी सैनिक, दिव्यांग) आणि प्रकल्पाच्या स्थानानुसार (शहरी/ग्रामीण) १५% ते ३५% पर्यंत अनुदान उपलब्ध असून लाभार्थी योगदान ५% ते १०% इतके आहे.

अर्ज प्रक्रिया अधिकृत पोर्टलवरून ऑनलाइन करणे आवश्यक असून https://maha-cmegp.gov.in या संकेतस्थळावर अर्ज सादर करता येतो. शहरी भागांसाठी जिल्हा उद्योग केंद्रे (DICs) तर ग्रामीण भागांसाठी महाराष्ट्र खादी व ग्रामोद्योग मंडळ अंमलबजावणी संस्था आहेत.

कार्यक्रमात श्री. बनसोडे सनी विनायक (उद्योग निरीक्षक, जिल्हा उद्योग केंद्र, रायगड–अलिबाग), श्री. किशोर गोरटे (तालुका अभियान व्यवस्थापक, उमेद) आणि सौ. आदिती कनगुटकर (प्रभाग समन्वयक, उमेद) यांनी उपस्थित नागरिकांना योजनांची माहिती, पात्रता, अर्ज प्रक्रिया व उद्योग उभारणीसाठी मार्गदर्शन केले. उपस्थित उद्योजक व इच्छुक नागरिकांनी या योजनांचा लाभ घेऊन स्वयंरोजगाराच्या संधी निर्माण करण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले.

## सणसर गावचा पैलवान मनिष रायते ठरला मुळशी केसरीचा मानकरी

**दैनिक युवक आधार**

**सणसर/विकास क्षत्रिय :** इंदापूर तालुक्यातील सणसर गावचा महाराष्ट्रभर प्रसिद्ध असणारा पैलवान म्हणून कारकीर्द कमवून सणसर गावाचे नाव मोठे करणारा पैलवान मनिष मनोहर रायते याने नुकत्याच मुळशी तालुक्यातील मुळशी केसरी किताबाची चांदीची गदा मिळवून सणसर गावाचे नाव पुन्हा प्रकाश झोतात आणले आहे.

पै.मनिष मनोहर रायते याच्याबद्दल त्याचा थोडा अल्प परिचय असा आहे की सणसर( रायतेमळा) ता.इंदापूर जि.पुणे येथील शेतकरी कुटुंबात त्याचा जन्म झाला असून त्याचे वडील मनोहर रायते व चुलते गणेश रायते हे दोघे सुद्धा कुस्ती करत होते त्यांना आपल्या घरातील मुलांनी या क्षेत्रात यावे असं मनोमन वाटत असताना त्यांच्यातील भवानीनगर येथील श्री छत्रपती हायस्कूल येथे ५ वी मध्ये पै मनिष याला शिक्षणासाठी ठेवण्यात आले असताना भवानीनगर येथील शाळेच्या अगदी जवळच छत्रपती व्यायामशाळा असल्यामुळे शाळा सुटल्यावर पै मनिष येथे सराव




करू लागला आणि त्याला कुस्ती क्षेत्राची आवड निर्माण झाली त्यावेळी भवानीनगर येथील वस्ताद पै.लालासाहेब गावडे यांचे मार्गदर्शन लाभले आणि तिथून तो वयाच्या 19 व्या वर्षी सणसर गावातील नामवंत पैलवान पांडुरंग भाऊ निंबाळकर व कै.पै.राजेंद्र बापू निंबाळकर यांच्या मार्गदर्शनाखाली पुणे येथील आंतरराष्ट्रीय कुस्ती संकुल येथे सरावासाठी गेला तिथे त्याला वस्ताद अर्जुनवीर पुरस्कार काकासाहेब पवार व गोविंद तात्या पवार यांच्याकडे प्रशिक्षणासाठी ठेवण्यात आले.

तेथून पुढे वस्ताद काकासाहेब पवार व गोविंद पवार यांचे मार्गदर्शन लाभले आणि त्याच्या यशाला महाराष्ट्रभर भरारी भेटली त्यांने आजवर एकावर एक अश्या सोळा-सतरा गदेचा मानकरी झाला 2024 ला पळसदेव येथील मैदानात त्याला पायाची दुखापत झाली आणि त्याला डॉक्टरांनी एक वर्ष रेस्ट घ्यायला लावली नंतर 2025 ला त्यांनी नवीन स्टार्टअप केले 2025 मध्ये त्यांनी मुळशी केसरी चा मानकरी ठरला.

## शेतकऱ्याचा चोरीस गेलेला ट्रॅक्टर व पेरणी यंत्र अवघ्या १२ तासांत जप्त

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी सय्यद इसा :** माहूर तालुक्यातील वडसा येथील शेतकरी शंकर दत्तात्रय चारोडे यांच्या शेतीकामासाठी वापरल्या जाणाऱ्या ट्रॅक्टर व पेरणी यंत्राची चोरी करणाऱ्या आरोपींचा शोध सिंदखेड पोलिसांनी अवघ्या १२ तासांत लावत यवतमाळ येथून मुद्देमाल जप्त केला. या धडाकेबाज कारवाईमुळे सिंदखेड पोलिसांच्या कामगिरीचे सर्वत्र कौतुक होत आहे.

वडसा येथील शेतकरी शंकर दत्तात्रय चारोडे यांनी दिलेल्या फिर्यादीत नमूद केल्यानुसार, त्यांच्या मालकीचा सोनालिका छत्रपती कंपनीचा ट्रॅक्टर व पेरणी यंत्र दिनांक १४ रोजी रात्री चोरीस गेले होते. अल्पावधीत चोरीचा छडा लावणे व मुद्देमाल जप्त करणे हे पोलिसांसमोर मोठे आव्हान होते.

जिल्हा पोलीस अधीक्षक अबीनाश कुमार, अपर पोलीस अधीक्षक अर्चना पाटील व उपविभागीय पोलीस अधिकारी किरण भोंडवे यांच्या मार्गदर्शनाखाली सिंदखेड पोलीस ठाण्याचे ठाणेदार रमेश जाधवर, तपास अधिकारी डी. जी.




चव्हाण, जमादार संजय शेंडे व संदीप वानखेडे यांनी तांत्रिक तपास व गोपनीय माहितीच्या आधारे तपासाची चक्रे वेगाने फिरवली.

या कारवाईत तब्बल ७ लाख ९० हजार रुपयांचा मुद्देमाल यवतमाळ येथून जप्त करण्यात आला असून आरोपी पीयूष दिलीप मुंनगीलवार, रोहित पावडे व शेख सलमान शेख माजीद (तिघेही राहणार वडसा, ता. माहूर) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या चोरीप्रकरणात निष्पन्न झालेल्या आरोपींची नावे समोर येताच वडसा गावासह माहूर परिसरात खळबळ उडाली असून, शेतकऱ्यांमध्ये सिंदखेड पोलिसांच्या तत्परतेबद्दल समाधान व्यक्त होत आहे.

# मानवी मूल्यांच्या प्रसारात पालखेडच्या विद्यार्थ्यांची नेत्रदीपक कामगिरी

**दैनिक युवक आधार**

**नाशिक /राहुल कुलकर्णी :** पालघर येथील रामकृष्ण मिशन, सकवार यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या 'स्वामी विवेकानंदांचा मानवी मूल्यांचा प्रसार (ज्ञानयात्रा)' या विषयावरील प्रश्नमंजुषा स्पर्धेत महाराष्ट्र शिक्षण संस्थेचे न्यू इंग्लिश स्कूल, पालखेड येथील तब्बल २८० विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. या स्पर्धेत शाळेच्या विद्यार्थ्यांनी विविध गटांत उल्लेखनीय व नेत्रदीपक यश संपादन केले.



इयत्ता आठवी अ मधून शिवम आहेर (प्रथम), सार्थक थेटे (द्वितीय), शाहू मेधने (तृतीय) यांनी तर इयत्ता आठवी ब मधून तनिष्का गायकवाड (प्रथम), दुर्वा गांगुर्डे (द्वितीय), नयना भोगे (तृतीय) यांनी यश मिळवले.

इयत्ता नववी अ मधून श्रुती शिंदे (प्रथम), सृष्टी जाधव (द्वितीय), अनुष्का थेटे (तृतीय) तर इयत्ता नववी ब मधून रुकसाना शेख (प्रथम), शिवकुमार नायक (द्वितीय), दिपाली गांगुर्डे (तृतीय) यांनी घवघवीत कामगिरी केली.

इयत्ता दहावी अ मधून विना थेटे (प्रथम), पूर्वा खैरे (द्वितीय), साई शेळके (तृतीय) तर इयत्ता दहावी ब मधून स्मितल मेधने (प्रथम), भाग्यश्री आहेर (द्वितीय), श्रावणी शिंदे (तृतीय) यांनी यश संपादन केले.

या यशस्वी विद्यार्थ्यांचा प्रमाणपत्र, वाचनीय पुस्तक व पुष्पगुच्छ देऊन मुख्याध्यापक अशोक शेळके व मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

या यशाबद्दल महाराष्ट्र शिक्षण संस्थेचे अध्यक्ष गुलाबराव जोंधळे, उपाध्यक्ष निवृत्ती नाना थेटे, कार्यकारी संचालक दीपक जोंधळे, कार्याध्यक्ष दत्तात्रय जोंधळे, रामकृष्ण मिशन सकवारचे कार्यवाह स्वामी तत्त्वरूपानंद महाराज, संकेत गव्हाणकर, प्रसाद जोशी आदींनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

याप्रसंगी मुख्याध्यापक अशोक शेळके यांच्यासह निलेश गवांदे, दीपक देशमुख, हेमंतकुमार होलगडे, सुनंदा दुर्धवळे, संजय लव्हांगडे, मंगेश कागदे, शैलेश शिखरे, किरण थेटे, राहुल दवते, वैशाली मोते, सागर जाधव, राजेंद्र नाठे, संदीप आहेर, दत्तात्रय पगार, सावन जाधव, संजय कोकतरे, कविता ढोमसे, सारिका पवळे, सुरेश गांगुर्डे, रामदास पवार, नदीम तांबोळी आदी शिक्षकवृंद व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## अनेक वर्षापासून प्रलंबित असलेल्या रस्त्याच्या कामाला मुहूर्त सापडला; अभय नगर मधील रहिवाशांची होणार चिखलापासून सुटका

**दैनिक युवक आधार**

**रमेश राऊत/कल्याण :** ठाणे महानगर पालिकेतील दिवा प्रभाग समिती अंतर्गत येणाऱ्या अभय नगर मधील रस्त्याची गेल्या अनेक वर्षापासून अत्यंत दुरावस्था झाली होती.पाण्याच्या पाईपलाईन लिकीज मुळे सतत रस्त्यावर पाणी साचून येथे चिखल होत होता येथील रहिवासी दैनिक युवक आधारचे पत्रकार श्री.रमेश राऊत आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे शाखाध्यक्ष श्री.घनश्याम पाटील वारंवार या रस्त्याच्या नूतनीकरणासाठी प्रयत्न करीत होते.दिवा प्रभाग समितीतील अधिकारी तसेच येथील काही





राजकीय पक्षातील लोकांशी पण या रस्त्याच्या नूतनीकरनाची मागणी केली होती,याची दखल श्री.किशोर जनार्दन दळवी यांनी तसेच शिवसेना शिंदे गटाचे उपविभाग प्रमुख श्री. दीपेश पाटील यांनी घेतली, ठाणे महानगरपालिकेकडे निधी उपलब्ध नसल्यामुळे ठाणे महानगरपालिकेचे माजी उपमहापौर श्री रमाकांत मढवी, माजी नगरसेवक श्री. राजन नारायण किणे यांच्या सहकार्याने तसेच कल्याण लोकसभेचे खासदार माननीय श्रीकांत एकनाथजी शिंदे यांच्या मदतीने महाराष्ट्र राज्याचे माननीय उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेब यांच्यामार्फत महाराष्ट्र शासनाच्या विशेष निधी मधून काम मंजूर करून घेतले आणि या कामाला दि. १४डिसेंबर२०२५रोजी सुरुवात केली. रस्त्याचे काम सुरू झाल्यामुळे अभय नगर मधील रहिवाशांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले आहे. श्री. किशोर जनार्दन दळवी आणि श्री दीपेश पाटील यांचे श्री.रमेश राऊत आणि श्री.घनश्याम पाटील यांनी अभय नगर वाशियांकडून आभार व्यक्त केलेआणि सुरू केलेले काम वेळेत पूर्ण करावे अशी आशा व्यक्त केली. ज्याप्रमाणे रस्त्याची समस्या सोडवण्याचा प्रयत्न केला त्याचप्रमाणे अभय नगर येथील रहिवाशांची पाण्याची समस्या ही सोडवण्याचा प्रयत्न करावा अशी मागणी रहिवाश्यान मार्फत करण्यात आली.

तसेच महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री माननीय श्री. एकनाथजी शिंदे साहेब त्याचबरोबर ठाणे महानगरपालिकेचे माजी उपमहापौर श्री.रमाकांत मढवी,माजी नगरसेवक श्री. राजन नारायण किणे यांनी महाराष्ट्र शासनाची विशेष निधी उपलब्ध करून दिल्याबद्दल यांचे सुद्धा रहिवाशीयांकडून आभार व्यक्त करण्यात आले.

## मनोज जरागें पाटील यांच्या दौऱ्यानंतर खांदा कॉलनीत मराठा व्होट बँक सक्रिय व्होट बँक निर्णायक ठरण्याची शक्यता

**दैनिक युवक आधार**

**खांदा कॉलनी प्रतिनिधी** : खांदा कॉलनीत प्रभाग 15 मध्ये निवडणूकीचे बिगूल वाजल्यानंतर महायुती व महाविकास आघाडी या दोन्ही आघाडीतून तिकीट मागणीसाठी इच्छुकांनी जोरदार फिल्डीग लावल्याचे पहावयास मिळत आहे अनुसूचित जाती साठी राखीव असलेल्या प्रवर्गातून महायुतीकडून एकनाथ गायकवाड तर महाविकास आघाडी कडून महादेव वाघमारे यांची उमेदवारी निश्चित असल्याचे मानले जात असून त्यांनी आपल्या प्रचाराला देखील सुरूवात केली आहे उरलेल्या तीन जागा साठी आघाडी व महायुती मध्ये रस्सीखेच असल्याचे दिसून येत आहे जवळपास 26 हजार मतदार संख्या असलेल्या या प्रभागात मराठा मतदार मोठ्या संख्या असल्याने उमेदवारांची निवड करताना यंदा पक्षश्रेष्ठी कशा प्रकारे निकष लावतील हे सांगता येत नाही त्यातच मनोज जरागें पाटील यांच्या दौऱ्यानंतर मराठा व्होट बँक मोठ्या प्रमाणात सक्रिय झाल्यानंतर दोन्ही बाजूंनी यंदा मराठा उमेदवारांना प्राधान्य मिळणार असल्याचे संकेत मिळत आहेत मराठा मतदार 8 ते 10 हजारांच्या आसपास तर दलित मतदार 3 ते 4 हजारांच्या आसपास असलेल्या या प्रभागात दोन्ही मतांची गोळा बेरीज करणारे उमेदवार पक्षश्रेष्ठी कडून शोधले जात असल्याची चर्चा आहे

मनोज जरागें पाटील यांच्या दौऱ्यानंतर मराठा व्होट बँक मोठ्या प्रमाणात सक्रिय झाल्यानंतर महायुती व महाविकास आघाडी या दोन्ही बाजूंनी उमेदवार निवडताना खांदा कॉलनीतल विविध सामाजिक संघटनेशी चर्चा करून उमेदवार निवडले जाणार असल्याचे संकेत मिळत आहेत

## पनवेल महापालिकेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर स्वाभिमानी युथ रिपब्लिकन पार्टीचे जिल्हा अध्यक्ष महेश साळुंखे यांची पक्षाचे अध्यक्ष सागर भाई संसारे यांच्या सोबत चर्चा

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (वार्ताहर)** : स्वाभिमानी युथ रिपब्लिकन पार्टीचे रायगड जिल्हा अध्यक्ष महेश साळुंखे यांनी पक्षाचे अध्यक्ष सागर भाई संसारे यांची भेट घेऊन पनवेल महानगरपालिकेच्या निवडणुकीविषयी चर्चा केली. त्यावेळी सागर भाई संसारे यांनी पनवेल महानगरपालिकेच्या बाबतीत सर्व निर्णय घेण्याचे अधिकार महेश साळुंखे यांना दिलेले आहेत.महेश साळुंखे यांचा पनवेल महानगरपालिकेतील अनेक वॉर्डमध्ये जनसंपर्क आहे त्यामुळे त्यांच्याकडे अनेक राजकीय कार्यकर्ते हे उमेदवारीसाठी विचारणा करण्याकरता येत आहेत.

महेश साळुंखे यांनी सांगितले की महाविकास आघाडी असो किंवा महायुती असो जो आम्हाला सन्मानाची वागणूक देईल व सत्तेमध्ये योग्य प्रकारे वाटा देईल त्या गटाला आम्ही आमच्या पक्षाचा जाहीर पाठिंबा देउ नाहीतर आम्ही स्वबळावर आमचे उमेदवार पनवेल महानगरपालिकेमध्ये उभे करू अशा



प्रकारची माहिती महेश साळुंखे यांनी दिलेली आहे. लवकरच याबाबत ते पत्रकार परिषद घेऊन आपली पुढील रणनीती स्पष्ट करणार आहेत.

# बांधकाम कामगारांच्या नावावर लूटमारीचा धंदा!

**दैनिक युवक आधार**

**सोयगाव तालुका प्रतिनिधी/ विजय काळे :** शहरात शासनाने बांधकाम कामगारांसाठी सुरू केलेल्या पेटी,भांडी,चक्की व भाडे योजनाच काही दलालांसाठी कमाईचे साधन बनल्या असून,सोयगाव तालुक्यात गरीब बांधकाम कामगारांची सरळसरळ आर्थिक लूट सुरू असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. सीएससी सेंटर व काही नेट कॅफे चालक "केवायसी नाही केली तर लाभ बंद होईल" अशी भीती घालून कामगारांकडून ५०० ते १५०० रुपये उकळत असल्याचे उघड झाले आहे.धक्कादायक बाब म्हणजे,अनेक कामगारांना पेटी व भांडी आधीच शासनाकडून मिळालेली असतानाही,यादी मिळवून काही एजंट थेट फोन करून खोटे आमिष दाखवत आहेत. अडचणीत असलेले गरीब कामगार या भूलथापांना बळी




पडून पैसे देत आहेत.हा प्रकार म्हणजे योजना लुटीचा उघड धंदा असल्याची चर्चा आहे.सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार,सिल्लोड तालुक्यातील काही व्यक्ती सोयगावमध्ये येऊन विघ्नहर्ता नेट कॅफे परिसरात ठाण मांडतात आणि दररोज १०० ते १५० कामगारांकडून प्रत्येकी ५०० रुपये उकळतात. यामध्ये दररोज सुमारे ५० हजार, तर महिन्याला लाखोंची उलाढाल होत असल्याचा आरोप आहे. प्रशासन याकडे डोळेझाक का करत आहे?असा संतप्त सवाल उपस्थित होत आहे.दरम्यान,सावळतबारा, मोलखेडा,नांद तांडा परिसरातील कामगार केवायसीसाठी सोयगावला आले असता,त्यांना केवायसीची गरजच नसल्याचे नंतर सांगण्यात आले.मात्र, तोपर्यंत वेळ,पैसा व मानसिक शांतता हिरावून घेतली गेली होती.हा प्रकार म्हणजे कामगारांची थेट फसवणूक असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. या प्रकाराविरोधात सावळतबारा–मोलखेडा येथील बांधकाम कामगारांनी इतर कामगारांना अशा फोन कॉल्स व आमिषांना बळी पडू नये असे आवाहन केले आहे. सुशिलाबाई वारगणे (रा. मोलखेडा,सावळतबारा) यांनीही आपला अनुभव मांडत या लुटीचा पर्दाफाश केला आहे.दरम्यान,बांधकाम कामगार कार्यालयातील अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले की, कार्यालयात केवळ कागदपत्रांची पडताळणी होते. "नेट कॅफे चालक किती पैसे घेतात याबाबत आमचा संबंध नाही. शासन नियमानुसार केवायसीसाठी केवळ १०० ते १५० रुपये शुल्क असून पावती देणे बंधनकारक आहे. पावती नसल्यास केवायसी ग्राह्य धरली जाणार नाही. सध्या आचारसंहिता लागू असल्याने संबंधित साईट १५ ते २० दिवस बंद राहण्याची शक्यता आहे," असेही अधिकाऱ्यांनी सांगितले.

प्रश्न असा आहे की — गरीब कामगारांच्या नावावर चाललेली ही उघड लूट थांबवणार कोण?

या संपूर्ण प्रकरणाची तात्काळ चौकशी करून दोषी एजंट व नेट कॅफे चालकांवर कठोर कारवाई करण्याची जोरदार मागणी बांधकाम कामगार व नागरिकांकडून होत आहे.

# नाताळ व नवीन वर्षांच्या पार्श्र्वभुमीवर बनावट मद्य वाहतुकीवर पनवेल परिसरात कारवाई

**दैनिक युवक आधार**

**पनवेल, (वार्ताहर)** : नाताळ व नवीन वर्षांच्या पार्श्र्वभुमीवर बनावट मद्य वाहतुकीवर पनवेल परिसरात राज्य उत्पादन शुल्क पनवेल ग्रामीण विभागाने कारवाई करून जवळपास चार चाकी गाडीसह एकूण 2,58,120 रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला असून याप्रकरणी एकाला ताब्यात घेतले आहे.

आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क महाराष्ट्र राज्य मुंबई राजेश देशमुख, संचालक, अंमलबजावणी व दक्षता, राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य, मुंबई, प्रसाद सुर्वे, विभागीय उप-आयुक्त राज्य उत्पादन शुल्क, कोकण विभाग, ठाणे प्रदीप पवार, अधीक्षक राज्य उत्पादन शुल्क, रायगड-अलिबाग रविकिरण कोले, यांचे मार्गदर्शनाखाली निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क पनवेल ग्रामीण विभाग यांनी तळोजा पोलिस स्टेशन हद्दीत शिवम अपार्टमेंट सेक्टर 16, फेज



2, घोटगाव रोडवर तळोजा येथे दारुबंदी गुन्ह्याकामी सापळा रचुन एका चारचाकी वाहनामध्ये बनावट विदेशी मद्याच्या वेगवेगळ्या ब्रँडच्या 144 बाटल्या व 01 चारचाकी वाहन असा एकूण 2,58,120/- रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करून आरोपी नामे जयवंत भोईर यास ताब्यात घेतले त्याच्याकडे सदर मद्याबाबत चौकशी केली असता त्याने सदरचे मद्य हे जवळच असलेल्या फ्लॅटमधून आणले असे सांगितले त्यानुसार त्या ठिकाणी जाऊन छापा टाकून बनावट विदेशी मद्याच्या वेगवेगळ्या ब्रँडच्या 250 बाटल्या असा एकुण रू.80,270/- किंमतीचा मुद्देमाल जप्त केला. सदर दोन्ही ठिकाणी मिळून एकूण 338390/- इतक्या किंमतीचा मुद्देमाल जप्त करून आरोपी जयवंत भोईर वय 38 वर्षे या इसमावर महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम 1949 अन्वये गुन्हा नोंदवून अटक करण्यात आली आहे.सदर कारवाई निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, पनवेल ग्रामीण विभाग अनिल जी. बिराजदार, दुय्यम निरीक्षक बीट क्र. 1- अजित बडदे, दुय्यम निरीक्षक बीट क्र.3 सुरेश झगडे, सहाय्यक दुय्यम निरीक्षक गैनिनाथ पालवे, जवान नि वाहनचालक सचिन कदम, जवान ऋषिकेश भोगे यांनी यशस्वीरित्या पार पाडली. सदरील गुन्हयाचा पुढील तपास रविकिरण कोले, अधीक्षक राज्य उत्पादन शुल्क, रायगड-अलिबाग यांच्या मार्गदर्शनाखाली अजित बडदे, दुय्यम निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क पनवेल ग्रामीण विभाग क्र.1 जि. रायगड हे करीत आहेत.

## मातेरवाडीच्या मातीचा अभिमान! माजी विद्यार्थी दत्तू झुरडे भारतीय सैन्यात दाखल – विद्यालयातर्फे भव्य सत्कार

**दैनिक युवक आधार**

**कृष्णा गायकवाड (पिंपळगाव बसवंत) :** अभिनव बालविकास मंदिर व नूतन इंग्लिश स्कूल, मातेरवाडी या विद्यालयाचा माजी विद्यार्थी दत्तू झुरडे याची भारतीय सैन्य दलात निवड झाल्याबद्दल विद्यालयात विशेष सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले. देशसेवेच्या पवित्र मार्गावर पाऊल ठेवणाऱ्या या तरुणाच्या यशामुळे संपूर्ण गावासह विद्यालय परिवारात अभिमान व आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

सार्वजनिक वाचनालय अध्यक्ष विक्रांत (आप्पा) सूर्यवंशी यांनी दिलेल्या अधिक माहिती नुसार या



सत्कारप्रसंगी विद्यालयाच्या माध्यमिक स्कूल कमिटीचे अध्यक्ष माननीय श्री. मोहन रावजी जाधव हे प्रमुख उपस्थित होते. त्यांच्या समवेत स्कूल कमिटी सदस्य माननीय श्री. सागर दादा गटकळ, माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष माननीय श्री. हर्षल रेडे यांची विशेष उपस्थिती लाभली.

कार्यक्रमात विद्यालयाच्या मुख्याध्यापिका श्रीमती गांगुर्डे के. पी. यांनी दत्तू झुरडे यांचे कौतुक करताना, "शिस्त, परिश्रम व देशभक्तीची बीजे शालेय जीवनातच रुजतात, याचे हे जिवंत उदाहरण आहे," असे गौरवोद्गार काढले.

यावेळी ज्येष्ठ शिक्षक श्री. भवर सर, श्री. तिडके सर, श्री. गायकवाड सर, श्री. भरसट सर, श्री. सोनवणे सर तसेच महिला शिक्षक भगिनी उपस्थित होत्या. सर्व मान्यवरांनी दत्तू झुरडे यांचा सत्कार करून त्यांच्या पुढील सैन्यसेवेच्या वाटचालीस मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या.

या यशामुळे मातेरवाडी गावाचा व विद्यालयाचा नावलौकिक वाढला असून, दत्तू झुरडे यांची प्रेरणादायी वाटचाल भावी विद्यार्थ्यांसाठी आदर्श ठरेल, असा विश्वास उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केला.

## नॅशनल नर्सिंग कॉलेजचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात; अब्दुल सत्तार यांच्या उपस्थितीत गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार!

**दैनिक युवक आधार**

**योगेश पालोदकर/सिल्लोड :** नॅशनल एज्युकेशन सोसायटी संचलित नॅशनल नर्सिंग कॉलेजचे वार्षिक स्नेहसंमेलन मंगळवार, दिनांक १६ रोजी सिल्लोड येथील सेना भवन परिसरात मोठ्या उत्साहात संपन्न झाले. या कार्यक्रमास माजी मंत्री तथा आमदार अब्दुल सत्तार यांची प्रमुख उपस्थिती होती. आमदार सत्तार यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी त्यांनी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले आणि आधुनिक नर्सिंगच्या संस्थापक फ्लोरेन्स नाइटिंगेल यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहिली.

या स्नेहसंमेलनात विद्यार्थ्यांनी नृत्य, गीत, नाट्यछटा आणि इतर विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर करून उपस्थितांची मने जिंकली. विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना प्रोत्साहन देण्यासाठी यावेळी विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमादरम्यान शैक्षणिक व इतर क्षेत्रांत गुणवत्ता प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

यावेळी बोलताना आमदार अब्दुल सत्तार यांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अशा




उपक्रमांचे महत्त्व विशद केले. तसेच, त्यांनी नर्सिंग क्षेत्रातील सेवाभाव, शिस्त आणि जबाबदारी या मूल्यांची जाणीव विद्यार्थ्यांना करून दिली आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

प्राचार्या आस्मा मुजावर यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन भारती सपकाळ आणि हुसैन शाह यांनी केले, तर उपस्थितांचे आभार अर्जुन दांडगे यांनी मानले. उपप्राचार्य विनय ढेपे, शीतल काटकर, शीतल शिंदे, अर्चना खरात, ऋषिकेश खिलारे, रोहित गरुड, आरती गावंडे, पवन मानकर आदिंसह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी परिश्रम घेतले. या स्नेहसंमेलनामुळे विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचे आणि एकोप्याचे वातावरण निर्माण झाले होते.

# वाळू चोरी करून नेणारा ट्रॅक्टर पकडला

- गस्तीवर असलेल्या तलाठ्यांची अर्ध्या रात्री धडक
- वाळू घाटावर गस्त करण्यासाठी दोन वाहना सह अग्नी शस्त्रांची नितांत गरज
- पाच लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त

**दैनिक युवक आधार**

**श्रीक्षेत्र माहूर/प्रतिनिधी सय्यद इसा :** माहूर तालुक्यातील मौजे साकुर कुपटी रस्त्यावरील नाल्यातून अर्ध्या रात्री विना नंबरच्या फार्मट्रेक कंपनीच्या ट्रॅक्टर मध्ये अवैध रित्या वाळू भरून विक्रीसाठी नेत असलेला ट्रॅक्टर महसूलच्या पथकातील तलाठ्यांनी पकडून माहूरच्या तहसील कार्यालयात पाच लाखाचा




मुद्देमाल जमा केल्याची घटना दि 15 रोजी रात्री 11 वाजता घडली आहे

जिल्हाधिकारी राहुल कर्डिले सहाय्यक जिल्हाधिकारी जेनीत चंद्रा दोन्तूंला तसेच माहूरचे तहसीलदार अभिजीत जगताप नायब तहसीलदार कैलास जेठे यांच्या मार्गदर्शनाखाली तालुक्यात ठीक ठिकाणी नदीपात्रावर तसेच नाल्यावर वाळू चोरी होऊ नये म्हणून बैठे आणि फिरत्या पथकांची नेमणूक करण्यात आलेली आहे तालुक्यात अनेक ठिकाणी पैनगंगा नदी पात्रावर बैठ्या पथकांची नेमणूक झाल्याने अनेक वाळू तस्कर नाल्यावरून वाळू चोरी करण्याचा प्रयत्न करत असल्याची माहिती मिळत असल्याने याआधी अनेक ठिकाणी ट्रॅक्टर पकडून तहसील कार्यालयात जमा करण्यात आले आहेत तर दि 15 रोजी रात्री तहसीलदार अभिजीत जगताप नायब तहसीलदार कैलास जेठे यांच्या मार्गदर्शनाखाली फिरत्या पथकात गस्तीवर असलेले ग्राम महसूल अधिकारी पवन यादव मनोहर चेके सुनील वनवे ओमप्रकाश तवर कोतवाल बंडू चिरंगे विलास शेळके संदीप रणमले हे कुपटी ते साकुर रस्त्यावर गस्त घालत असताना नाल्यातून वाळू भरून बाहेर आलेला विना नंबरचा फार्मट्रेक कंपनीचा ट्रॅक्टर दिसल्याने त्यास अडवून पाहणी केली असता त्यामध्ये विनापरवानगी वाळू भरून वाहतूक करत असलेला आढळून आल्याने त्यास तत्काळ पकडून माहूरच्या तहसील कार्यालयात आणून पाच लाखाचा मुद्देमाल जप्त करण्यात येऊन त्यावर महसूल सहाय्यक वैभव घोडे यांनी तहसीलदार अभिजीत जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली कायदेशीर कारवाईसाठी प्रस्ताव पाठविला आहे

माहूर तालुक्यातील पाचही वाळू घाटांची वाळू लिलाव प्रक्रिया रखडल्याने तालुक्यात वाळूच्या मागणीत प्रचंड वाढ झालेली असल्याने वाळू तस्कर मोठ्या हिमतीने नाल्यातून वाळू काढत दहा हजार रुपये बरासने विक्री करण्याचा प्रयत्न करत असल्याने तहसीलदार अभिजीत जगताप यांनी नदीपात्रासह तालुक्यातील प्रत्येक रस्त्यावर गस्त वाढविली असून गस्तीसाठी आणखी दोन वाहनाची नितांत गरज असल्याने अनेक ठिकाणी विदर्भातील मुजोर वाळू तस्कर सोबत अग्निशस्त्र ठेवत असल्याने पथकातील कर्मचाऱ्यांना तात्काळ नवीन दोन वाहनासह अग्नि शस्त्र द्यावे अशी मागणी जोर धरत असून एखादेवेळी अनुचित प्रकार घडून जीव जाण्याची शक्यता नाकारता येत असल्याने जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी माहूर पैनगंगा नदी पात्रावरील वाळू घाट तात्काळ लिलाव करावे अशी मागणी होत आहे.

## पचनसंस्था आणि बद्धकोष्ठता समजून घ्या : निरोगी पोटासाठी सोपी मार्गदर्शिका

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी राहुल मडावी/नागपूर :** पचनसंस्थेचे आरोग्य आपल्या संपूर्ण आरोग्यावर खूप मोठा परिणाम करते, याची अनेकांना याची कल्पना नसते. आपल्या पोटाचे काम फक्त अन्न पचवणे आणि पोषकद्रव्ये शरीराला देणे एवढेच नसून, ते रोगप्रतिकारशक्ती वाढवणे, हार्मोन्स नियंत्रित ठेवणे, तसेच मूड आणि ऊर्जा प्रभावित करण्यासही मदत करते. पचनसंस्था नीट काम करत असेल तर संपूर्ण शरीराला फायदा होतो. पण पचन मंदावले किंवा बिघडले तर त्याचा त्रास लगेच जाणवू लागतो. डॉ. पियुष मरुडवार सांगतात, “आपली पचनसंस्था आपल्या जीवनशैलीचे प्रतिबिंब आहे. जर आपण त्याची नियमित काळजी घेतली, तर ते आपल्याला चांगले आरोग्य, ऊर्जा आणि आराम देते.”

डॉ. पियुष मरुडवार, कन्सल्टंट गॅस्ट्रोएन्टेरोलॉजिस्ट, वोक्हार्ट हॉस्पिटल, नागपूर यांनी सांगितले, बद्धकोष्ठता ही पचनाशी संबंधित सर्वात सामान्य पण अनेकदा दुर्लक्षित केली जाणारी समस्या आहे. बरेच लोक तिला तात्पुरता त्रास समजतात, परंतु वारंवार होणारी बद्धकोष्ठता म्हणजे पचनसंस्थेत बिघाड झाल्याचे स्पष्ट संकेत आहेत. यामध्ये कमी वेळा शौचास जाणे, कडक शौच होणे, शौचास त्रास होणे किंवा शौच पूर्ण न झाल्याची भावना असे लक्षणे दिसतात. कधीकधी बद्धकोष्ठता होणे सामान्य असू शकते, परंतु सतत किंवा पुन्हा-पुन्हा त्रास होत असेल तर पचनसंस्थेत गंभीर बिघाड असल्याचे दर्शवते. डॉ. मरुडवार सांगतात, “बद्धकोष्ठता ही फक्त पोटाची समस्या नाही; ती मूड, भूक, ऊर्जा, झोप आणि दीर्घकालीन पचनाच्या आरोग्यावर परिणाम करते.”

बद्धकोष्ठतेची अनेक कारणे रोजच्या आयुष्यातील सवयी असतात. कमी फायबरयुक्त अन्न खाणे, पुरेसे पाणी न पिणे, बसून राहण्याची सवय, जास्त प्रमाणात प्रक्रिया केलेले अन्न किंवा पॅकेज्ड फूड खाणे, आणि अनियमित जेवणाच्या सवयी पचनात अडथळा निर्माण करू शकतात. ताणतणाव, ज्याकडे अनेकदा दुर्लक्ष केले जाते, तोही पचन मंदावण्यास मोठा कारणीभूत असतो. औषधे जसे की पेनकिलर, अँटासिड्स, आयर्न टॅबलेट्स किंवा काही सप्लिमेंट्स, जर मार्गदर्शनाशिवाय नियमित घेतल्या तर ही समस्या आणखी वाढवू शकतात. डॉ. मरुडवार सांगतात, “छोट्या-छोट्या जीवनशैलीच्या चुकीच्या सवयींमुळे मोठ्या पचनाच्या समस्या निर्माण होतात.”

पचनसंस्थेतील समस्यांची सुरुवातीची लक्षणे ओळखल्यास भविष्यातील गंभीर समस्या टाळता येतात. पोट फुगणे, पोटदुखी, कडक शौच, जोर लावावा लागणे, मळमळ, किंवा शौचात रक्त येणे अशी लक्षणे कधीही दुर्लक्षित करू नयेत. सततची बद्धकोष्ठता कधीकधी थायरॉईड, डायबिटीज, आयबीएस (इरिटेबल बॉवेल सिंड्रोम) किंवा कोलनमध्ये रचनात्मक समस्या यांसारख्या अंतर्निहित आजारांचे संकेत असू शकते. यावर वेळेत लक्ष दिले नाही तर फिशर, पाइल्स, गुदाशयातील त्रास किंवा दीर्घकालीन वेदना होऊ शकतात. डॉ. मरुडवार सांगतात, “आपले शरीर नेहमीच संकेत देते. जर दोन-तीन आठवड्यांपेक्षा जास्त काही लक्षणे कायम दिसली, तर तपासणी करणे गरजेचे आहे.”

सुदैवाने, पचन चांगले ठेवण्यासाठी मोठे बदल करणे गरजेचे नाही. काही सोप्या आणि नियमित सवयी मोठा फरक करू शकतात. फळे, भाज्या, संपूर्ण धान्य, डाळी आणि सॅलड यांसारखे फायबरयुक्त अन्न पोट साफ ठेवते. पुरेसे पाणी प्यायल्यास पचन सहज होते. दही, ताक, लोणचे किंवा इतर फर्मेंटेड अन्न पोटातील चांगले बॅक्टेरिया वाढवतात आणि पचन नैसर्गिकरीत्या सुधारतात. नियमित व्यायाम, अगदी रोज 20–30 मिनिटे चालणे सुद्धा पचन सक्रिय ठेवते. तसेच, पोटाची नैसर्गिक गरज (शौच) आल्यावर ती टाळू नये, कारण वारंवार टाळल्यास बद्धकोष्ठता वाढू शकते.

मानसिक आरोग्याचाही पचनावर मोठा परिणाम होतो. ताणतणावामुळे पोटाची हालचाल मंदावते आणि पचन बिघडते आणि ॲसिडिटीवर परिणाम करतो. शांतपणे जेवणे, जेवताना मोबाईल किंवा टीव्ही पाहणे टाळणे, खोल श्वास घेण्याचे व्यायाम करणे आणि पुरेशी झोप घेणे हे पचन सुधारण्यासाठी मदत करतात. डॉ. मरुडवार सांगतात, “शांत मन आणि निरोगी पोट हे एकमेकांशी जोडलेले असतात. हे दोन वेगळे करता येत नाहीत.”

शेवटी, पचनसंस्थेचे आरोग्य हे आपल्या जीवनमानासाठी दीर्घकालीन गुंतवणूक आहे. बद्धकोष्ठता आणि पचनातील त्रास सामान्य असले तरी ते नैसर्गिक समजून दुर्लक्षित करू नये. योग्य माहिती, वेळेवर उपचार आणि निरोगी सवयी अंगिकारल्यास पचनसंस्था सुरक्षित राहते आणि रोजच्या आराम व आरोग्यात सुधारणा होते. डॉ. मरुडवार सांगतात, “तुमचे पोट तुमच्यासाठी सतत काम करत असते. त्याची चांगली काळजी घ्या, ते तुम्हाला निरोगी, आनंदी आणि ताकदवान ठेवेल.”



**तज्ज्ञ मार्गदर्शन : डॉ. पियुष मरुडवार, कन्सल्टंट गॅस्ट्रोएन्टेरोलॉजिस्ट, वोक्हार्ट हॉस्पिटल, नागपूर**

## एकलव्य सेनेचे अध्यक्ष ज्ञानेश्वर अहिरे यांच्याकडून येडूआई गड परिसराची पाहणी

**दैनिक युवक आधार**

**वार्ताहर :** श्री शेत्र पिंपळदरी ता. अकोले येथील येडू मातेच्या गडाची एकलव्य भिल्ल सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष ज्ञानेश्वर अहिरे यांनी कार्यकर्त्यां समवेत आज पहाणी केली. येडू आई गड परिसर यात्रेवेळी चार दिवस आरक्षित करावा अशी मागणी संघटनेने प्रशासनाकडे केली असून प्रशासनाकडून सदर यात्रा परिसर राखीव करण्यासाठी हालचाली सुरू झाल्या आहेत. त्या अनुषंगाने नेमका किती परिसर यात्रेसाठी राखीव ठेवावा याची पडताळणी करण्यासाठी एकलव्य भिल्ल सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष ज्ञानेश्वर अहिरे यांनी कार्यकर्त्यां समवेत गड परिसराची पाहणी केली. व जवळपास तीस एकर परिसरामध्ये हा यात्रा उत्सव भरावाला जातो असे निदर्शनास आले. संपूर्ण राज्यातून लाखो भिल्ल समाज या यात्रेत सहभागी होऊन आपली नवसपुर्ती करतो तसेच दोन-तीन दिवस अगोदर येऊन येडुआई गड परिसरात मुलाबाळांसह वास्तव्य करतो. परंतु जागा उपलब्ध नसल्याने अनेक कुटुंबे नवस्फूर्ति न करताच माघारी जातात. त्यामुळे इथून पुढील काळामध्ये यात्रेच्या तीन दिवस अगोदर व यात्रेच्या मुख्य दिवशी असे चार दिवस परिसरातील जमीन राखीव ठेवावी अशी मागणी संघटनेने जिल्हाधिकाऱ्यांकडे केली



होती त्या अनुषंगाने नेमक्या किती क्षेत्रात यात्रा भरवली जाते? असा प्रश्न शासनाकडून करण्यात आला होता त्या अनुषंगाने आज एकलव्य भिल्ल सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष ज्ञानेश्वर अहिरे यांनी परिसराची पाहणी केली व जवळपास तीस एकरावरील क्षेत्रामध्ये यात्रा भरवली जाते असे नमूद केले. सदर यात्रेसाठी क्षेत्र राखीव करण्यासाठी शासनाकडे पाठपुरा करून येणाऱ्या यात्रेमध्ये जागा राखीव करण्यासाठी शासनावर दबाव आणला जाणार आहे असे श्री अहिरे यांनी यावेळी म्हटले. त्यामुळे नेमके किती क्षेत्र यात्रेसाठी राखीव होते याकडे राज्यातील भिल्ल समाजाचे लक्ष लागले आहे .यावेळी येडूबाई अनुदान कमिटीचे संपर्कप्रमुख राधाकृष्ण बर्डे, आष्टी तालुका अध्यक्ष शंकर बर्डे, प्रख्यात गायिका सविता दादेगावकर, हौसाराम बर्डे, गणेश बर्डे, अनिता माळी, सुरज माळी, परसराम गोधडे, राजेंद्र पिंपळे, निवृत्ती पवार, दीपक बर्डे, संतोष गांगुर्डे, अश्विनी बर्डे, छाया साळुंखे आदी पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सशक्त बेटी, बलशाली भारत : किशोरवयीन मुलींमध्ये रक्तक्षयावर मात करण्यासाठी विनायक दळवी चॅरिटेबल फाउंडेशनचा विशेष उपक्रम

**दैनिक युवक आधार**

**नाशिक / प्रतिनिधी :** भारतात रक्तक्षय (ॲनिमिया) ही एक प्रमुख सार्वजनिक आरोग्य समस्या आहे. राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षण-५ (NFHS-५, २०१९-२१) नुसार, १५-१९ वयोगटातील किशोरवयीन मुलींमध्ये रक्तक्षयाचे प्रमाण ५९.१ टक्के इतके आहे, जे NFHS-४ (२०१५-१६) मधील ५४ टक्क्यांवरून वाढले आहे. महिलांमध्ये हा आकडा ५७ टक्के आहे. या समस्येमुळे मुलींच्या शारीरिक व मानसिक विकासावर गंभीर परिणाम होतो, थकवा, एकाग्रतेचा अभाव आणि भविष्यात गर्भधारणा व बाळंतपणाच्या वेळी माता व बाळ दोघांच्याही आरोग्याला धोका निर्माण होतो. आहारातील लोहाची कमतरता, मासिक पाळीतील रक्तस्राव, अनुवांशिक कारणे आणि अपुरी जागरूकता ही याची मुख्य कारणे आहेत.

महिलांमध्ये सामान्य हिमोग्लोबिनची पातळी १२ ते १५ ग्रॅम/डेसीलिटर असावी, मात्र अनेक मुलींमध्ये ही पातळी त्यापेक्षा कमी आढळते. रक्तदान शिबिरांमध्ये मुली मोठ्या संख्येने सहभागी होतात, परंतु कमी हिमोग्लोबिनमुळे त्यांना नाकारले जाते, ही वस्तुस्थिती या समस्येची गंभीरता दर्शवते.

या पार्श्वभूमीवर, विनायक दळवी चॅरिटेबल फाउंडेशन (VDCF) चे अध्यक्ष श्री. विनायक दळवी यांच्या नेतृत्वाखाली "सशक्त बेटी, बलशाली भारत" हा नवीन उपक्रम सुरू करण्यात आला आहे. हा प्रकल्प केंद्र सरकारच्या 'ॲनिमिया मुक्त भारत' (Anemia Mukt Bharat) योजनेला पूरक आहे, विशेषतः ॲनिमिया ८ ते १३ वर्षांच्या किशोरवयीन मुलींना लक्ष्य करतो. हा वयोगट अनेकदा दुर्लक्षित राहतो, मात्र याच वयात योग्य हस्तक्षेप केल्यास भविष्यातील माता व कुटुंबाच्या आरोग्यावर सकारात्मक परिणाम होऊ शकतो.

'ॲनिमिया मुक्त भारत' योजना २०१८ मध्ये सुरू झाली असून, ती ६ लाभार्थी गटांना (६-५९ महिन्यांच्या बालकांपासून ते प्रजनन वयोगटातील महिलांपर्यंत), ६ हस्तक्षेपांद्वारे (लोह व फॉलिक ॲसिड पूरक, जंतनाशक औषधे, वर्तणूक बदल मोहीम, डिजिटल तपासणी, फोर्टिफाइड अन्न आणि इतर कारणांचे निराकरण) आणि ६ संस्थात्मक यंत्रणेद्वारे राबवली जाते. या योजनेचा उद्देश दरवर्षी ३ टक्के रक्तक्षय कमी करणे हा आहे.

"VDCF" चा हा उपक्रम याच योजनेला बळ देणारा आहे. प्रकल्पाची मुख्य वैशिष्ट्ये अशी:

प्राथमिक तपासणी: रक्तदान शिबिरांसारखी कॉपर सल्फेट द्रावणाची साधी थेंब चाचणी (ड्रॉप टेस्ट) वापरून शाळांमध्ये स्क्रीनिंग. कमतरता आढळल्यास सरकारी आरोग्य केंद्रांमध्ये किंवा डिजिटल हिमोग्लोबिनोमीटरद्वारे पुष्टीकरण आणि उपचार.

जागरूकता मोहीम: शाळांमध्ये डॉक्टरांचे व्याख्यान, प्रश्नोत्तर सत्रे, पालकांसाठी विशेष सत्रे. महान कवयित्री बहिणाबाई चौधरी यांच्या शैलीतील स्थानिक भाषेतील (मराठी) व्हिडिओ क्लिप्स आणि जिंगल्सद्वारे हिमोग्लोबिन व्यवस्थापन, पौष्टिक आहार आणि सरकारी योजनांबद्दल वैज्ञानिक माहिती. राष्ट्रीय स्तरावर विस्तार झाल्यास हिंदी आवृत्तीही तयार केली जाईल.

उपचार आणि दीर्घकालीन देखरेख: कमतरता असलेल्या मुलींना सरकारी योजनांद्वारे लोह व फॉलिक ॲसिडच्या गोळ्या, पूरक आहार आणि आहार सल्ला. सलग तीन वर्षे प्रगतीवर लक्ष ठेवले जाईल.

सहकार्य आणि विस्तार: महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ (MUHS), सरकारी शाळा, आरोग्य विभाग यांच्यासह UNICEF, रोटरी, लायन्स क्लब, प्रजापिता ब्रह्माकुमारी विश्वविद्यालय यांसारख्या संस्थांचे सहकार्य. सुरुवातीला वैद्यकीय महाविद्यालयांच्या परिसरातील शाळांमध्ये राबवले जाईल आणि नंतर दुर्गम भागात विस्तार.

हा उपक्रम कमी खर्चात आणि रणनीतिकदृष्ट्या प्रभावी ठरेल, कारण एक सशक्त मुलगी संपूर्ण कुटुंब आणि समाजाला बळ देऊ शकते. तपासणी शिबिरे पात्र कर्मचाऱ्यांद्वारे आयोजित केली जातील आणि पालकांची लेखी संमती (हमीपत्र) अनिवार्य असेल.

श्री. विनायक दळवी म्हणाले, "सशक्त बालिका म्हणजे कलची माता आणि सशक्त परिवार म्हणजे बलशाली भारत. हा उपक्रम कमी प्रयत्नांत मोठे परिणाम देईल, विशेषतः जर शाळा, आरोग्य विभाग आणि सामाजिक संस्थांनी पाठिंबा दिला तर."

शाळांना विशेष आवाहन: शाळा मुख्याध्यापक, शिक्षक आणि व्यवस्थापनांना विनंती आहे की, आपल्या शाळेत तपासणी शिबिर आणि जागरूकता कार्यक्रम आयोजित करा. पालकांची संमती घेऊन (नमुना फॉर्म उपलब्ध) मुलींच्या आरोग्यासाठी योगदान द्या. ही मोहीम शाळेतील सर्व मुलींना ॲनिमियापासून मुक्त करण्यासाठी महत्त्वाची ठरेल.

अधिक माहिती व सहभागासाठी संपर्क: विनायक दळवी, अध्यक्ष, विनायक दळवी चॅरिटेबल फाउंडेशन. संपर्क: ९८६९४७७४६७.

## साई श्रद्धा संस्थेच्या वतीने महिला बचत गटांचा भव्य गेट-टुगेदर कार्यक्रम उत्साहात संपन्न

**दैनिक युवक आधार**

**डोंबिवली(प्रतिनिधी-गुरुनाथ तिरपणकर) :** रविवार दिनांक १४ डिसेंबर २०२५ रोजी, साई श्रद्धा विविध कार्यकारी सेवा संस्था (रजिस्टर डोंबिवली), स्थानिक महिला बचत गट व डॉ. अग्रवाल आय केअर हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने विभागीय महिला बचत गटांचा भव्य गेट-टुगेदर कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाचे आयोजन संस्थेचे संस्थापक अध्यक्ष श्री कैलास सणस यांनी केले होते.



आमच्या विभागात चाळीस बचत गट आहेत. त्या बचत गटांना शासनाच्या विविध योजनांची माहिती देणे, जनजागृती करण्याचे काम सणस साहेब करत असतात तेही अगदी मोफत मार्गदर्शन करतात. या कार्यक्रमाच्या माध्यमातून विविध महिला बचत गटांना एकत्र आणून, धिन धिन धिंगाना, मौज-मजा-मस्ती, नाच-गाणे, डान्स तसेच विविध मनोरंजनात्मक स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. महिलांना त्यांच्या आवडीनुसार स्वतःला व्यक्त करता यावे, यासाठी साई श्रद्धा संस्थेच्या वतीने एक मोकळा व प्रेरणादायी व्यासपीठ उपलब्ध करून देण्यात आला.

या गेट-टुगेदर कार्यक्रमास मोठ्या संख्येने विविध बचत गटांतील महिलांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

बेधुंद नाचत-गात महिलांनी आनंदाचा जल्लोष करत कार्यक्रम यशस्वी केला. कार्यक्रमाचे उत्कृष्ट नियोजन डॉ. अग्रवाल आय केअर हॉस्पिटल चे मॅनेजर श्री. दीपक त्रिंबककर यांनी केले.

यावेळी काही मित्र परिवारासह अनेक प्रतिष्ठित मान्यवरांनी उपस्थिती लावून कार्यक्रमाची शोभा वाढवली. यामध्ये समाजसेविका व जनजागृती सेवा संस्थेच्या सह खजिनदार सौ. श्रुती उरणकर मॅडम, जनसेवक श्री. अनमोल म्हात्रे, श्री. विजय भोईर, सौ. सुवर्ण भोईर, श्री. मनोज वैद्य, माजी नगरसेवक श्री. विकास म्हात्रे साहेब, दानशूर व्यक्तीमत्व श्री. प्रल्हादजी म्हात्रे साहेब तसेच इतर अनेक मान्यवरांनी विनंतीला मान देऊन आवर्जून उपस्थित राहून महिलांचे मनोबल वाढवले.

सदर कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी साई श्रद्धा विविध कार्यकारी सेवा संस्थेच्या संघटिका सौ. ज्योती उबाळे, मंगलताई पांचाळ, तृप्ती चौव्हाण, सौ. पूजा दुधाळ, सौ. मयुरी गायकर, सौ. नूतन पाटील, मृणाली सणस, गौरी उबाळे यांनी मोलाचे सहकार्य केले. तसेच संस्थेचे कार्यकारी सदस्य सचिन उबाळे व करण चौव्हाण यांनीही विशेष योगदान दिले.

कार्यक्रमास उपस्थित मान्यवरांचे स्वागत व सत्कार संस्थेचे कार्याध्यक्ष प्रवीण उर्फ पऊ साळवी यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित सर्व सदस्य, महिला बचत गट प्रतिनिधी तसेच मान्यवरांचे मनःपूर्वक आभार संस्थेचे संस्थापक अध्यक्ष श्री कैलास सणस यांनी मानले.महिलांच्या सशक्ती करणासाठी, एकोपा वाढवण्यासाठी व सामाजिक सलोखा निर्माण करण्यासाठी असे उपक्रम अत्यंत उपयुक्त असून पुढील काळातही असे कार्यक्रम सातत्याने राबविण्यात येणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

# योजना केवळ नावालाच! वृक्ष गेले गावाला?

## निसर्ग समृद्धी कागदावरच; सामाजिक वनीकरणाचा लाखोंचा सावळा गोंधळ...

**दैनिक युवक आधार**

**सोयगाव तालुका प्रतिनिधी / विजय काळे :** पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी शासनाकडून राबविण्यात येणाऱ्या विविध निसर्ग समृद्धी व सामाजिक वनीकरण योजना प्रत्यक्षात मात्र कागदावरच हिरवळ निर्माण करणाऱ्या ठरत असल्याचे भयावह चित्र समोर आले आहे.लाखो रुपयांचा निधी खर्च करून वृक्ष लागवडीचे गाजावाजा झाले,पण प्रत्यक्ष रस्त्याच्या दुतर्फा आज एकही जिवंत वृक्ष दिसत नाही,ही बाब सामाजिक वनीकरण विभागाच्या कार्यप्रणालीवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित करणारी आहे. जरंडी–निंबायती रस्ता तसेच तालुक्यातील विविध मार्गांवर सामाजिक वनीकरण सोयगाव विभागामार्फत वृक्ष लागवडीसाठी मोठा निधी खर्च करण्यात आला होता. मात्र प्रत्यक्ष पाहणी केली असता या संपूर्ण मार्गावर वृक्ष लागवडीचे नामोनिशाणही शिल्लक नाही. वृक्ष लावलेच गेले का,की निधीच हवेत विरला ?असा संतप्त सवाल ग्रामस्थ व वृक्षप्रेमींमधून उपस्थित होत आहे.जरंडी परिसरातील कंकराळा ते जरंडी (४ किमी), जरंडी ते निंबायती (३ किमी), जरंडी चौफुली ते पिंपळगाव (हरे) (३ किमी) यासह तालुक्यातील तब्बल ५२ किलोमीटर रस्त्याच्या दुतर्फा वृक्ष



लागवड केल्याचा दावा करण्यात आला होता.मात्र आज हे सर्व रस्ते बोडके, उजाड आणि उन्हाच्या झळांनी होरपळलेले दिसत आहेत.वृक्ष लागवडीनंतर त्यांचे संगोपन,पाणीपुरवठा,खत मात्रा,संरक्षण ही जबाबदारी संबंधित यंत्रणेवर असते. नियमाप्रमाणे दर तीन महिन्यांनी पाणीपुरवठा,प्रति किलोमीटर एक डीएपी व एक पोते युरिया खत देणे आवश्यक असताना यापैकी काहीच प्रत्यक्षात होत नसल्याचे स्पष्ट झाले आहे.याबाबत सामाजिक वनीकरण विभागाकडून चकार शब्दही काढला जात नाही,हे अधिक गंभीर आहे.दरम्यान, नियमबाह्य पद्धतीने मर्जीतील ठेकेदारांना कामे देणे,वृक्ष लागवड केवळ कागदावर दाखवणे आणि निधी परस्पर लाटल्याच्या चर्चांनी जोर धरला आहे. पर्यावरण संवर्धनाच्या नावाखाली निधीचा चुराडा होत असल्याचे चित्र स्पष्टपणे दिसत आहे.पर्यावरणाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या या योजना प्रत्यक्ष अंमलबजावणीशिवाय कागदापुरत्याच का मर्यादित राहतात?असा प्रश्न आज वृक्षप्रेमी, नागरिक आणि पर्यावरणप्रेमींना सतावत आहे. त्यामुळे “योजना केवळ नावालाच,वृक्ष गेले का गावाला?” हा प्रश्न आता अनुत्तरित राहिलेला नाही, तर तो प्रशासनाला जाब विचारणारा ठोस आरोप ठरत आहे. संबंधित या विभागाच्या अधिकाऱ्यांना संपर्क करण्याचा प्रयत्न केला असता संबंधित अधिकाऱ्यांनी फोन उचलले नाही......

# विद्यार्थ्यांच्या जीवाशी तडजोड नको! स्कूल बसमधील सीसीटीव्हीबाबत युवासेना आक्रमक

## शासन निर्णयाची तात्काळ अंमलबजावणी न झाल्यास युवासेनेचा आंदोलनाचा इशारा

**दैनिक युवक आधार**

**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधी :** विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा मुद्दा पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे,शाळा प्रशासनाकडून आणि बस कंत्राटदारांकडून नियमांची पायमल्ली होत असल्याचा आरोप करत, युवासेनेने आज दि.१६-१२-२०२५ रोजी आक्रमक पवित्रा घेतला."विद्यार्थ्यांच्या जीवाशी तडजोड खपवून घेतली जाणार नाही," असा इशारा देत युवासेना विधानसभा प्रमुख ॲड योगेश ठाकरे,युवासेनेचे तालुकाध्यक्ष मयूर जुमळे यांनी प्रशासनाला धारेवर धरले.

महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण विभागाने विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने दिनांक १३ मे २०२५ रोजी सर्व शाळा व स्कूल बसमध्ये सी.सी.टी.व्ही. कॅमेरे बसविणे बंधनकारक करणारा शासन निर्णय जारी केला आहे. मात्र राळेगाव तालुका व शहरातील अनेक शाळांच्या बसमध्ये आजही सी.सी.टी.व्ही. कॅमेरे बसविलेले नाहीत किंवा ते कार्यरत नसल्याचे चित्र असून,ही बाब शासन निर्णयाची थेट पायमल्ली आहे.युवासेना तालुका राळेगाव यांच्या वतीने यासंदर्भात आज मा.उपविभागीय अधिकारी साहेब राळेगाव व गटशिक्षण अधिकारी,पंचायत समिती राळेगाव यांना निवेदन देऊन प्रशासनाचे लक्ष वेधण्यात आले आहे.सी.सी.टी.व्ही.अभावी दररोज प्रवास करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला असून,एखादी अनुचित घटना घडल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित शाळा व्यवस्थापन व प्रशासनावर राहील,असा स्पष्ट इशारा युवासेनेने दिला आहे. शासन निर्णयाची तात्काळ अंमलबजावणी करून सर्व स्कूल बसची तपासणी करावी, नियमांचे उल्लंघन करणाऱ्या शाळा व्यवस्थापन,बस मालक व चालकांवर मोटार वाहन कायद्यानुसार कठोर कारवाई करावी तसेच सी.सी. टी.व्ही. बसविण्यासाठी ठोस कालमर्यादा निश्चित करून त्याची सक्तीने अंमलबजावणी करावी,अशी ठाम भूमिका युवासेनेने मांडली आहे. प्रशासनाने या विषयावर वेळकाढूपणा केल्यास विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी युवासेना तालुका राळेगाव रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन,मोर्चा व निषेध आंदोलन करेल याची प्रशासनाने गंभीर नोंद घ्यावी.विद्यार्थ्यांची सुरक्षितता हा अत्यंत संवेदनशील विषय असून,शासन निर्णयाची अंमलबजावणी तातडीने करण्यात यावी,अशी जोरदार मागणी युवासेना तालुका राळेगाव यांच्या वतीने निवेदनाच्या माध्यमातून करण्यात आली आहे. यावेळी ॲड.योगेश ठाकरे युवासेना विधानसभा अध्यक्ष राळेगाव विधानसभा,मयूर जुमळे तालुका प्रमुख युवासेना राळेगाव , सागर वर्मा,महेश राउत,जगदीश निखोडे,कार्तिक कावलकर,सुजल मेश्राम,ध्रुप राउत,प्रणय मुडे,गौरव वाघाडे , निखील कोवे,चेतन वैद्य,महेश जुमनाके,गीतेश अलबनकर , समीर येरेकार,युवराज चटकी,गजानन बुठे,अक्षय भोकटे आदी युवासेनेचे पदाधिकारी यावेळी उपस्थित होते.

# पुस्तकी ज्ञानापेक्षा तंत्रज्ञानाशी जोडणे ही काळाची गरज – प्रवीण ठाकूर

**दैनिक युवक आधार**

**पनवेल प्रतिनिधी :** आजच्या वेगाने बदलणाऱ्या डिजिटल युगात विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकातील ज्ञान देणे पुरेसे नसून त्यांना आधुनिक तंत्रज्ञानाशी जोडणे ही काळाची गरज आहे, असे प्रतिपादन विस्टा फूड लिमिटेडचे जी. एम. (ऑपरेशन) प्रवीण ठाकूर यांनी केले. ते नवीन पनवेल येथील श्री संत साईबाबा शाळेत आयोजित संगणक वितरण कार्यक्रमात बोलत होते.

विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी संगणक ज्ञान, डिजिटल साक्षरता आणि तंत्रज्ञानाचा वापर अत्यंत महत्त्वाचा असल्याचे सांगताना ठाकूर म्हणाले की, आजच्या स्पर्धात्मक जगात टिकून राहण्यासाठी विद्यार्थ्यांनी लहान वयातच तंत्रज्ञानाशी मैत्री करणे आवश्यक आहे.



यामुळे त्यांचा आत्मविश्वास वाढून भविष्यातील विविध संधींसाठी ते अधिक सक्षम बनतील.

याच सामाजिक जाणिवेतून तळोजा एमआयडीसीतील विस्टा फूड लिमिटेड या कारखान्याच्या वतीने श्री संत साईबाबा शाळेला तीन संगणक भेट देण्यात आले. या उपक्रमामुळे शाळेतील विद्यार्थ्यांना डिजिटल शिक्षणाची सुविधा उपलब्ध होणार असून संगणक शिक्षण अधिक प्रभावीपणे राबवता येणार आहे.या कार्यक्रमाला इंद्रायणी आगलावे (ईजीएम – एचआर), कमलेश शिर्के (ईजीएम – इंजिनिअरिंग), प्रथमेश पाटील, तसेच शाळेच्या मुख्याध्यापिका वैशाली पाटील, शिक्षकवर्ग आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमात बोलताना मुख्याध्यापिका वैशाली पाटील म्हणाल्या की, श्री संत साईबाबा शाळेतील बहुतांश विद्यार्थी हे अल्प उत्पन्न गटातील तसेच समाजातील शेवटच्या घटकातील आहेत. अशा विद्यार्थ्यांनाही नव्या तंत्रज्ञानाशी जोडले जाणे हा त्यांचा अधिकार आहे. त्यासाठी आवश्यक सुविधा निर्माण करणे ही आपली सामाजिक जबाबदारी आहे. समाजातील विस्टा फूड लिमिटेडसारख्या दानशूर कंपनी पुढे येत असल्यामुळेच अशा विद्यार्थ्यांसाठी आधुनिक शिक्षणाची दारे खुली होत आहेत, असेही त्यांनी नमूद केले. विद्यार्थ्यांना शिक्षणासोबतच तंत्रज्ञान, शिस्त आणि मूल्यांची जाणीव असणे आवश्यक असल्याचे मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी उपलब्ध झालेल्या संधींचा योग्य वापर करून आपले भविष्य उज्ज्वल करावे, असे आवाहनही यावेळी करण्यात आले.कार्यक्रमाच्या शेवटी शाळेच्या वतीने विस्टा फूड लिमिटेड कंपनीचे व उपस्थित मान्यवरांचे आभार मानण्यात आले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन देविदास गायकवाड यांनी केले.

# पेन्शनधारक : सन्मानपूर्वक वृद्धत्वाची सामाजिक हमी

**दरवर्षी १७ डिसेंबर हा दिवस ‘पेन्शनधारक दिन’ म्हणून साजरा केला जातो. हा दिवस निवृत्त कर्मचाऱ्यांचा केवळ औपचारिक सन्मान करण्यापुरता मर्यादित नसून, राष्ट्रनिर्मितीच्या दीर्घ प्रक्रियेत आयुष्याची सर्वोत्तम वर्षे अर्पण करणाऱ्या व्यक्तींप्रती समाजाने व्यक्त करावयाच्या कृतज्ञतेचा दिवस आहे. प्रशासन, शिक्षण, संरक्षण, पोलीस, आरोग्य, सार्वजनिक उपक्रम, औद्योगिक व तांत्रिक क्षेत्र अशा विविध क्षेत्रांत कार्यरत असलेल्या लाखो कर्मचाऱ्यांनी शिस्त, निष्ठा आणि प्रामाणिकपणाने आपली सेवा बजावली. आज दिसणाऱ्या संस्था, व्यवस्था आणि सार्वजनिक सुविधा या त्यांच्या अथक श्रमांचे फलित आहेत. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहिले असता, पेन्शनधारक हे केवळ निवृत्त कर्मचारी नसून समाजाच्या सातत्याचे, अनुभवाचे आणि मूल्यव्यवस्थेचे जिवंत प्रतिनिधी आहेत.**

पेन्शन ही संकल्पना केवळ निवृत्तीनंतर मिळणाऱ्या आर्थिक रकमेपुरती मर्यादित नाही तर ती सामाजिक सुरक्षिततेचा मूलभूत आधार आहे. आधुनिक कल्याणकारी राज्यव्यवस्थेत पेन्शन म्हणजे व्यक्ती आणि राज्य यांच्यातील सामाजिक करार होय. व्यक्ती आपल्या कार्यकाळात श्रम, कौशल्य, वेळ आणि निष्ठा समाजासाठी देते; त्याबदल्यात निवृत्तीनंतर तिला सन्मानपूर्वक, सुरक्षित आणि स्वावलंबी जीवन देणे ही राज्याची नैतिक व घटनात्मक जबाबदारी ठरते. त्यामुळे पेन्शनधारक दिन हा सामाजिक न्याय, मानवी प्रतिष्ठा आणि सन्मानाने जगण्याच्या अधिकाराची आठवण करून देणारा महत्त्वाचा दिवस ठरतो.

भारतीय समाजात पारंपरिकरीत्या वृद्धांना मानाचे स्थान होते. संयुक्त कुटुंबपद्धतीत ज्येष्ठ नागरिक हे अनुभवाचे मार्गदर्शक, मूल्यसंस्कारांचे वाहक आणि निर्णयप्रक्रियेतील आधार मानले जात. मात्र औद्योगिकीकरण, शहरीकरण, जागतिकीकरण, शिक्षण व रोजगारासाठी होणारे स्थलांतर आणि बदलती जीवनशैली यांमुळे कुटुंबरचना झपाट्याने बदलली. संयुक्त कुटुंबांची जागा लहान व एकल कुटुंबांनी घेतली. या सामाजिक परिवर्तनाचा सर्वाधिक परिणाम वृद्ध आणि निवृत्त व्यक्तींवर झाला. अनेक पेन्शनधारकांना आज एकाकीपणा, भावनिक असुरक्षितता आणि सामाजिक दुर्लक्ष यांचा सामना करावा लागत आहे. अशा परिस्थितीत पेन्शन ही केवळ आर्थिक आधार न राहता, आत्मसन्मान टिकवून ठेवणारी जीवनरेषा ठरते.

वाढती महागाई हा पेन्शनधारकांच्या जीवनातील गंभीर प्रश्न आहे. निश्चित उत्पन्न आणि सातत्याने वाढणारा खर्च यातील दरी दिवसेंदिवस वाढत चालली आहे. औषधोपचार, वैद्यकीय तपासण्या, रुग्णालयीन सेवा, घरभाडे, वीज-पाणी, वाहतूक आणि दैनंदिन गरजा यांचा खर्च मोठ्या प्रमाणात वाढला आहे. वृद्धावस्थेत आरोग्यविषयक समस्या वाढतात आणि त्यासाठी अनपेक्षित खर्च करावा लागतो. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहता, ही स्थिती केवळ वैयक्तिक अडचण नसून सामाजिक सुरक्षेच्या अपुऱ्या व्यवस्थेचे द्योतक आहे. त्यामुळे पेन्शन व्यवस्थेत महागाईनुसार सुधारणा आणि आरोग्यसुरक्षेची हमी अधिक बळकट करणे अपरिहार्य ठरते.

पेन्शनधारकांना भेडसावणाऱ्या अडचणी आर्थिक मर्यादित नसून प्रशासकीय स्वरूपाच्याही आहेत. पेन्शन मंजुरीतील विलंब, कागदपत्रांची



गुंतागुंत, नियमांतील अस्पष्टता, जीवन प्रमाणपत्राची प्रक्रिया, बँकिंग अडचणी आणि तक्रार निवारणातील उदासीनता यांमुळे अनेक निवृत्त कर्मचारी मानसिक तणावात राहतात. डिजिटल युगात अनेक सेवा ऑनलाइन झाल्या असल्या, तरी सर्वच पेन्शनधारक डिजिटलदृष्ट्या साक्षर असतीलच असे नाही. बायोमेट्रिक अडचणी, तांत्रिक बिघाड आणि डिजिटल दरी यामुळे कधी कधी हक्क असूनही सेवा मिळविणे कठीण जाते. म्हणूनच तंत्रज्ञानाचा वापर करताना मानवी संवेदनशीलता आणि प्रत्यक्ष सहाय्य यांना तितकेच महत्त्व देणे आवश्यक आहे.

निवृत्ती म्हणजे सामाजिक आयुष्यातून निवृत्ती नव्हे, हे समाजाने समजून घेणे गरजेचे आहे. अनेक पेन्शनधारक आजही शिक्षण, समाजसेवा, स्वयंसेवी संस्था, स्थानिक स्वराज्य संस्था, पर्यावरण संवर्धन, वाचन चळवळ, समुपदेशन आणि मार्गदर्शन अशा विविध क्षेत्रांत सक्रिय योगदान देत आहेत. त्यांचा अनुभव, शिस्त आणि विवेक समाजासाठी अमूल्य आहे. मात्र योग्य व्यासपीठे आणि संधी उपलब्ध नसल्यामुळे हा अनुभव अनेकदा दुर्लक्षित राहतो. समाजशास्त्र स्पष्टपणे सांगते की ‘सक्रिय वृद्धत्व’ ही संकल्पना केवळ वृद्धांच्या आरोग्यासाठी नव्हे, तर समाजाच्या सुदृढतेसाठीही अत्यंत महत्त्वाची आहे.

कुटुंबव्यवस्थेत पेन्शनधारकांचे स्थान बदलत चालले आहे. आर्थिक स्वावलंबनामुळे काही प्रमाणात स्वातंत्र्य मिळत असले, तरी अनेक वेळा निर्णयप्रक्रियेतून त्यांना दूर ठेवले जाते. बदलत्या मूल्यव्यवस्थेमुळे वृद्धांचे अनुभव ‘कालबाह्य’ समजले जातात. यामुळे आत्मसन्मानाला धक्का बसतो आणि भावनिक दुरावा वाढतो. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहता, पिढ्यांमधील संवाद तुटणे ही समाजासाठी गंभीर समस्या आहे. पेन्शनधारक दिन हा पिढ्यांमधील संवाद, परस्पर आदर आणि सामाजिक सलोखा वाढविण्याची संधी ठरायला हवा.

शासनाच्या धोरणांच्या संदर्भात पाहता, पेन्शन व्यवस्था ही केवळ आर्थिक भार म्हणून पाहणे योग्य ठरणार नाही. ती सामाजिक स्थैर्य, नागरिकांचा राज्यावरील विश्वास आणि सामाजिक सलोखा टिकवून ठेवणारी व्यवस्था आहे. किमान पेन्शनची हमी, महागाई निर्देशांकानुसार नियमित सुधारणा, सुलभ व पारदर्शक प्रशासकीय प्रक्रिया, सर्वसमावेशक आरोग्य सुविधा, औषधांवरील सवलत आणि प्रभावी तक्रार निवारण यंत्रणा अधिक बळकट करण्याची गरज आहे. विशेषतः असंघटित क्षेत्रातील कामगार, महिला कर्मचारी आणि अल्प उत्पन्न गटातील निवृत्त व्यक्ती यांच्यासाठी सामाजिक सुरक्षा अधिक व्यापक असली पाहिजे.पेन्शनधारक दिन आपल्याला आत्मपरीक्षण करण्यास भाग पाडतो. आपण समाज म्हणून आपल्या ज्येष्ठ नागरिकांशी किती संवेदनशील आहोत? त्यांच्या योगदानाची जाणीव आपण केवळ दिनविशेषापुरती ठेवतो की दैनंदिन जीवनातही सन्मान, सहानुभूती आणि जबाबदारी दाखवतो? समाजाची प्रगती ही केवळ तरुण पिढीच्या ऊर्जेवर अवलंबून नसून ज्येष्ठांच्या अनुभवावरही उभी असते. हा समतोल जपणे म्हणजेच सामाजिक प्रगल्भतेची खरी ओळख होय.

शेवटी, पेन्शनधारक म्हणजे समाजावर ओझे नसून समाजाची मौल्यवान संपत्ती आहेत. त्यांनी उभारलेल्या संस्था, रुजवलेली मूल्ये आणि निर्माण केलेली व्यवस्था यांवरच आजचा समाज उभा आहे. त्यांचा सन्मान करणे म्हणजे आपल्या भूतकाळाचा सन्मान करणे आणि भविष्यातील स्वतःच्या वृद्धत्वाबद्दल संवेदनशील राहणे होय. १७ डिसेंबरचा पेन्शनधारक दिन हा केवळ एक दिनविशेष न राहता सामाजिक कृतज्ञतेचा, न्यायाचा आणि मानवी मूल्यांचा जागर ठरला, तरच तो खऱ्या अर्थाने अर्थपूर्ण ठरेल.

**- डॉ. राजेंद्र बगाटे (लेखक समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)**